


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २९७ ■ गुरूवार, दि. ७ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

## 60 वर्षीय नराधमाचे अत्याचार प्रकरण

# सहा तासांचा हलगर्जीपणा आरोपी झाला फरार....



### ▶▶ आ. रोहित पवार यांचा गंभीर आरोप ▶▶ चान्नी पोलिस, एल सी बी चे अपयश अधोरेखित





प्रतिनिधी ७ मे

**अकोला :** माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना अकोला जिल्ह्यातील पातूर तालुक्यात उघडकीस आली आहे. एका १० वर्षीय निष्पाप बालिकेवर ६० वर्षांच्या एका नराधमाने अत्याचार केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात संतापाची लाट उसळली आहे. या सर्व प्रकरणात पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास सहा तासापेक्षा अधिकचा कालावधी लावल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी येथे लावला. त्यांनी आज पिडित परिवाराची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. यावेळी आ.नितीन देशमुख, जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे, रफिक सिद्दीकी, देवानंद टाले यांची उपस्थिती होती.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने पीडित बालिकेला गाठून तिच्यावर अत्याचार केला. एवढेच नव्हे तर, 'मी खूप पोहोचलेला माणूस आहे, माझे कोणी काहीही करू शकत नाही,' अशी धमकी देत त्याने बालिकेला घाबरवण्याचा प्रयत्न केला. त्याने बालिकेच्या आई-वडिलांनाही जीवे मारण्याची किंवा अडचणीत आणण्याची भीती घातली होती. असा दावा आज आ.रोहित पवार यांनी येथे केला. त्यामुळे पोलिस यंत्रणेवर अप्रत्यक्षपणे त्यांनी जोरदार ताशेरे ओढले आहे. गुन्हा दाखल करण्यासाठी सहा तासांचा कालावधी का लागला आणि आरोपी फरार होण्यास कोणी मदत केली अशी विचारणा आ.रोहित पवार यांनी केली. त्याच बरोबर या सर्व प्रकरणात गुन्हा दाखल होऊ नये यासाठी कोण्या राजकारण्याने प्रयत्न केले याची चौकशी होण्याची मागणी आता समोर येत आहे.

### पीडितेचे धाडस आणि तक्रार

सुरुवातीला प्रचंड घाबरलेली ही चिमुकली काही काळ बोलण्याच्या मनस्थितीत नव्हती. मात्र, तिने धीर एकवटून सर्व प्रकार आपल्या आई-वडिलांना सांगितला. घटनेचे गांभीर्य ओळखून पालकांनी तातडीने पोलीस ठाणे गाठले आणि तक्रार नोंदवली. पालघर आणि पुण्यातील गुन्ह्यांमध्ये आरोपींना तातडीने अटक झाली, मग इथला आरोपी अजूनही मोकाट का ? असा प्रश्न आ.रोहित पवार यांनी उपस्थित केला. आरोपी स्वतःला 'मोठा माणूस' म्हणवून घेत पोलिसांवर दबाव आणण्याचा प्रयत्न करत असल्याचे बोलले जात आहे.

### पोलिसांसमोर अटकेचे आव्हान

घटनेला दोन दिवस उलटूनही मुख्य आरोपी अद्याप फरार आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास युद्धपातळीवर सुरू केला असून, विविध पथके आरोपीच्या मागावर आहेत. स्थानिक महिलांनीही या घटनेचा तीव्र निषेध केला असून, 'आम्ही शेतात काम करून पोट भरणाऱ्या महिला आहोत, आमच्या लेकीबाळी सुरक्षित नसतील तर आम्ही न्याय कोणाकडे मागायचा?' असा उद्विग्न सवाल उपस्थित केला आहे. पन्नास पोलिसांची टिम आरोपीला शोधत असून त्याचा थांगपत्ता मात्र मिळाला नाही. आरोपीने स्वतः तो यंत्रणेला हप्ते देत असल्याचे सांगितल्याने त्यांच्या अटकेची शक्यता धुसर वाटत असल्याची ओरड समाजमनात आहे.

### राज्य सरकार महिला व मुलींना सुरक्षा देण्यात अपयशी

राज्यातील महिला आणि मुलींवरील अत्याचाराला आळा घालण्यास सरकार अपयशी ठरत असून कठोर कायद्याअभावी आरोपींना कायद्याची कोणतीही जरब राहिलेली नाही. त्यामुळंच अत्याचार पिडीतांना तातडीने न्याय मिळण्यासाठी कठोर अशा शक्ती कायद्याची आमची मागणी आहे. विरोधकांची मागणी म्हणून सरकारने याकडं दुर्लक्ष केलं तर राज्यात महिला आणि मुलींवरील अत्याचाराची मालिका सुरुच राहतील आणि याची पूर्ण जबाबदारी ही केवळ सरकारचीच असेल असा इशारा आ. रोहित पवार यांनी दिला. आई-वडील शेतात मोलमजुरी करायला गेल्यानंतर शेजारीच राहणाऱ्या ६० वर्षाच्या नराधमाने १० वर्षाच्या चिमुकलीवर अत्याचार केल्याची घटना अकोला जिल्ह्यातील पातूर तालुक्यात घडली. या पिडीत कुटुंबियांची भेट घेऊन या घटनेची माहिती घेतली आणि यातील आरोपीला कठोर शिक्षा होण्यासाठी सोबत असल्याचा विश्वास आ. रोहित पवार यांनी दिला. या घटनेतील नराधम फरार असून त्याला तातडीने अटक करण्यासंदर्भात वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. यावेळी आ. नितीन देशमुख , मा. आ. सुनील भुसारा, स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

---

# सुवेंदु अधिकारी यांच्या पीएची गोळ्या झाडून हत्या!

प्रतिनिधी ७ मे

**कोलकाता:** पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील मध्यमग्राम येथे बुधवारी रात्री १०:३० वाजता भाजप नेते सुवेंदू अधिकारी यांचे वैयक्तिक सहाय्यक (पीए) चंद्रनाथ रथ (४२) यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. घटनेच्या वेळी चंद्रनाथ स्कॉर्पिओ गाडीतून कोलकाताहून मध्यमग्राममधील आपल्या घरी परतत होते.मिळालेल्या माहितीनुसार, ते चालक आणि आणखी एका व्यक्तीच्या शेजारी बसले होते. कोलकातापासून सुमारे २० किलोमीटर अंतरावर असलेल्या दोलतला आणि मध्यमग्रामच्या दरम्यान, मागून आलेल्या एका कारने स्कॉर्पिओचा रस्ता अडवला.त्यानंतर हल्लेखोर मोटारसायकलवरून आला आणि त्याने स्कॉर्पिओच्या डाव्या बाजूने सहा ते दहा गोळ्या झाडल्या. चंद्रनाथ यांना चार गोळ्या लागल्या, त्यापैकी दोन त्यांच्या छातीत आणि एक पोटात घुसली. चालक बुद्धदेव बेरा यांनाही गोळी लागली. घटनेनंतर हल्लेखोरांनी गाडी सोडून मोटारसायकलवरून पळ काढला. जखमींना तात्काळ जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी चंद्रनाथ यांना मृत घोषित केले. चालकाची प्रकृती गंभीर आहे. भाजपने ही घटना घडवल्याचा आरोप टीएमसीवर केला आहे.चंद्रनाथ रथावरील गोळीबारानंतर सुमारे एका तासाने, रात्री १२:३० च्या सुमारास बसीरहाट जिल्ह्यात रोहित रॉय नावाच्या भाजप कार्यकर्त्यावर गोळीबार झाला.

---

# मध्यमवर्गीय अकोलेकरांवर म्हाडाचा अन्याय

### पावणे दोनशे फ्लॅटसाठी साडेतीनशे फ्लॅटवर सोडले पाणी.....

लोकप्रतिनिधींची चुप्पी




प्रतिनिधी ७ मे

**अकोला:** दोन वर्षांनी तयार होणाऱ्या, राम नगर या अत्यंत क्रीम एरियात, म्हाडाने अकोलेकरांना पावणे दोनशे घरांचे चॉकलेट दिले आहे. त्याच वेळी म्हाडाने या पावणे दोनशे फ्लॅटच्या विकासासाठी साडेतीनशे फ्लॅटची जमीन कॉन्ट्रक्टरच्या घशात घातली आहे.

अकोला शहराचा मध्यवर्ती भाग आणि क्रीम एरिया म्हणून राम नगरचा उल्लेख होतो. या ठिकाणी घर असावे, फ्लॅट असावा हे सामान्य अकोलेकरांचे स्वप्न आता स्वप्नच राहणार आहे. रामनगरातील ही सुमारे साडे तेरा हजार स्वे मीटर इतकी जागा आहे. कारण या ठिकाणी पावणे दोनशे घरांचा विकास करताना म्हाडाने जवळपास साडेतीनशे घरांची जमीन कॉन्ट्रक्टरच्या नावाने केली आहे. हा सामान्य अकोलेकरांच्या जमीनीवर डल्ला असून ज्वाईंट व्हेंचर या गोंडस नावाखाली हा उद्योग म्हाडा ने केला आहे.

या विरोधात अकोल्यातील लोकप्रतिनिधींची चुप्पी का असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. राम नगर भागात टिन लावलेल्या ठिकाणी आता ४६ वन बी एच के आणि १३० टु बी एच के चा प्रोजेक्ट होत आहे. घरांची लॉटरी म्हाडा २०२८ किंवा २०२९ मध्ये काढेल. पण हे १७६ फ्लॅट विकसित करताना म्हाडाने विकासकाला जवळपास दूप्पट जागा देत त्याच्याकडून १७६ फ्लॅट बांधुन घेण्याचा करार केला आहे. ज्वाईंट व्हेंचर या गोंडस नावाखाली म्हाडाने जवळपास साडेतीनशे फ्लॅटवर पाणी फेरल्याची ओरड सुरु झाली आहे. पण, सर्व सामान्य लोकांच्या हक्कांसाठी असलेल्या या जागेची म्हाडाने परस्पर विल्हेवाट लावली असून लोकप्रतिनिधींची या विषयावरच्या अर्थपुर्ण चुप्पीबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. २०२४ मध्ये निघालेल्या या टेंडरचे काम २०२८ मध्ये पुर्ण होईल आणि त्यानंतर २०२८-२९ मध्ये १७६ फ्लॅटची लॉटरी म्हाडा काढेल. या विषयावर म्हाडाच्या वरिष्ठांनी कुठलिही प्रतिक्रिया दिली नाही.

---

# सप्तशृंगी ज्वेलर्सला लुटले



**अकोला:** बंदूकीच्या धाकावर आदर्श कॉलनी स्थित गोरक्षण रोडवर असलेल्या सप्तशृंगी अंलकार या दूकानातून अर्धा किलो सोने लंपास केल्याची माहिती समोर आली आहे. आज दूपारी १२ ते १ च्या सुमारास ही घटना घडल्याची माहिती दूकानाचे मालक विसपुते यांनी दिली. पोलिसांनी आरोपींचा शोध घेणे सुरु केले आहे. दरम्यान, अकोल्यात भर दिवसा झालेल्या या घटनेने सराफा व्यावसायिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# थलपति विजय पेचात

**चेन्नई :** तामिळनाडूच्या विधानसभा निवडणुकीत द्रमुक आणि अण्णाद्रमुक या प्रस्थापित पक्षांना झटका देत सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयाला आलेला तमिळगा वेत्री कळघम हा पक्ष आणि त्याचे प्रमुख असलेल्या विजय हे सध्या चांगलेच पेचात सापडले आहेत. विधानसभा निवडणुकीत टीव्हीके राज्यातील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयाला आल्याने सत्तास्थापनेसाठी त्यांना राज्यपालांनी आमंत्रित करणे अपेक्षित होते.

CLASSIFIED

पाहिजे

पार्ट टाईम अँड फुल टाईम जॉब करीता मुले पाहिजेत...!
१) मार्केटिंगसाठी ३ मुले (२ व्हिलर, आणि मोबाईल आवश्यक) वेळ ९ ते ५
२) माल पोहचवायला २ मुले

-:संपर्क:-

आदिराज इंटरप्रासेस
प्लॉट नं. ५०७
नमुना गल्ली नं. ४
राजकमल चौक, अमरावती
मो. 7028286766

---

# एकनाथ शिंदे यांनी बच्चू कडूंवर लावला विदर्भाचा डाव...!

### भाजपला अस्वस्थ ठेवण्यासाठी खेळला गेम...!

संदिप मानकर ७ मे







**अमरावती:** महायुतीमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे सर्वकाही ऑल वेल नाही. हे अनेकदा समोर आले आहे. एकनाथ शिंदे यांची विदर्भात ताकद वाढावी यासाठी बच्चू कडूंना आमदारकी बहाल करून त्यांच्या रूपात विदर्भावर डाव लावला आहे. आता ही राजकीय खेळी यशस्वी होते किंवा नाही? हे तर वेळच सांगणार असून मात्र माजी मंत्री राहिलेले बच्चू कडू यांचे राजकीय पुनर्वसन त्यांना आमदारकी मिळाल्याने झाले आहे हे खरे!

गतनिवडणुकीत जनतेने त्यांना नाकारले असले तरी मला नेत्याने स्वीकारले असल्याचा ते ठिकठिकाणी आपल्या भाषणात बोलत आहेत. भविष्यात मंत्री पदही आपल्या पारड्यात पाडून ते आता थेट एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री बनवल्या शिवाय मी स्वस्त बसणार नाही? असेही राज्यभर सांगत फिरत आहेत. भारतीय जनता पार्टीवर नेहमीच टीका करणारे बच्चू कडू आता एकनाथ शिंदे यांनाच मुख्यमंत्री करायला निघाल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपालाही हा विषय चांगला जिवारी लागत आहे. मात्र महायुतीत सर्व काही ऑल इज वेलच रहावे. याची काळजी नेहमीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेतात. त्यामुळे बच्चू कडूंच्या या विधानाकडेही राज्यसह जिल्हा पातळीवरचे नेते दुर्लक्षित करीत आहेत. विदर्भाचा हुकमी एक्का म्हणून उपमुख्यमंत्री शिंदे यांनी बच्चू कडू ला ठेवले आहे. मात्र शिंदे यांची ही राजकीय खेळी विदर्भात यशस्वी होते की? की फेल ठरते? अशी राजकीय चर्चा आतापासूनच राजकीय जाणकारांमध्ये होऊ लागली आहे. मात्र प्रहारची जी भूमिका आहे, तीच भूमिका शिवसेनेची राहील. असे विधान आमदार बच्चू कडू करीत आहेत. मी सत्तेत जरी गेलो असलो तरी शेतकऱ्यांसाठी, दिव्यांगांसाठी लढत राहील.

### अडसूळ पिता- पुत्रांची अस्वस्थता वाढली

▶▶ विदर्भात व अमरावती जिल्ह्यात शिवसेना जिवंत ठेवण्याचे काम हे अडसूळ पिता- पुत्रांनी केले आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेतून बाहेर पडल्यानंतर माजी मंत्री आनंदराव अडसूळ व त्यांचे पुत्र माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हात पकडला. त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून जिल्ह्यात राजकारण केले. मात्र गत निवडणुकीत महायुतीची खासदारकीची उमेदवारी नवनीत राणा यांना मिळाल्याने आनंदराव अडसूळ यांचे पत्त कट झाले. त्यानंतर त्यांचे पुत्र माजी आमदार अभिजीत अडसूळ यांनी महायुतीची शिवसेना शिंदे गटाची दर्यापूर मतदारसंघाची उमेदवारी आपल्या पारड्यात पाडून घेतली.

### तर बच्चू कडू महायुतीचे खासदारकीचे उमेदवार

▶▶ भविष्यात अमरावती लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जातीतून निघून ओपन झाल्यानंतर या ठिकाणी महायुतीकडे सक्षम उमेदवार नाही. भाजपवर नवनीत राणा पराभूत झाले आहेत. त्या भविष्यातही उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्न करतील. मात्र ओपन मतदारसंघांमध्ये महायुतीकडे सक्षम उमेदवार नसल्याने शिवसेना शिंदे गट खासदारकीसाठी बच्चू कडू यांना प्रमोट करू शकतो. यापूर्वीसुद्धा बच्चू कडू यांनी खासदारकीची निवडणूक लढवली आहे. मात्र ते त्यावेळेस पराभूत झाले होते.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
गुरुवार, दि. ७ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

**मुंबई :** राज्यातील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो कामगारांचे हित, सुरक्षा आणि सामाजिक संरक्षण अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. केंद्र सरकारने १ नोव्हेंबर २०२५ रोजी लागू केलेल्या नवीन चार कामगार संहितांच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र सरकारने आपल्या राज्याची नियमावली तयार केली असून त्याचा मसुदा नुकताच प्रसिद्ध केला आहे. या प्रस्तावित नियमावलीवर राज्यातील सर्व संबंधित घटकांनी आपल्या हरकती आणि सूचना कधी सूचना प्रसिद्ध झाल्याच्या ४५ दिवसांच्या आत नोंदवाव्यात, असे आवाहन राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले आहे. केंद्र शासनाने औद्योगिक संबंध, वेतन संहिता, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कार्यस्थळ परिस्थिती संहिता २०२०, तसेच सामाजिक सुरक्षा संहिता २०२० अशा चार प्रमुख संहिता देशभर लागू केल्या आहेत.

# नवीन कामगार नियमावलीचा मसुदा प्रसिद्ध : कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर



केंद्र सरकारने १ नोव्हेंबर २०२५ रोजी लागू केलेल्या नवीन चार कामगार संहितांच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र सरकारने आपल्या राज्याची नियमावली तयार केली असून त्याचा मसुदा नुकताच प्रसिद्ध केला आहे. या प्रस्तावित नियमावलीवर राज्यातील सर्व संबंधित घटकांनी आपल्या हरकती आणि सूचना कधी सूचना प्रसिद्ध झाल्याच्या ४५ दिवसांच्या आत नोंदवाव्यात, असे आवाहन राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी केले आहे.राज्यातील औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो कामगारांचे हित, सुरक्षा आणि सामाजिक संरक्षण अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

केंद्र शासनाने औद्योगिक संबंध, वेतन संहिता, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कार्यस्थळ परिस्थिती संहिता २०२०, तसेच सामाजिक सुरक्षा संहिता २०२० अशा चार प्रमुख संहिता देशभर लागू केल्या आहेत. या कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी राज्याला स्वतःची नियमावली तयार करणे आवश्यक होते. त्यानुसार, राज्य शासनाच्या कामगार विभागाने विधी व न्याय विभागाच्या अत्यंत सूक्ष्म तांत्रिक सहकार्याने ही नियमावली तयार केली आहे. या नियमावलीचा मसुदा २८ एप्रिल ते ५ मे २०२६ या कालावधीत अधिसूचनेद्वारे जनतेसाठी खुला करण्यात आला आहे.

या संदर्भात माहिती देताना कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर म्हणाले की, राज्याच्या प्रगतीमध्ये कामगारांचा वाटा सिंहाचा असतो. त्यामुळेच त्यांच्या कामाच्या ठिकाणची सुरक्षितता, त्यांचे आरोग्य आणि त्यांना मिळणारे वेतन या बाबींना राज्य सरकारने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. प्रस्तावित नियमावलीचा मुख्य उद्देश राज्यातील औद्योगिक शांतता टिकवून ठेवणे हा आहे. मालक आणि कामगार यांच्यातील संबंधांचे सुयोग्य नियमन करून दोघांमधील समन्वय वाढवणे, वेतनाच्या तरतुदी अधिक स्पष्ट आणि पारदर्शक करणे, ही या नियमावलीची वैशिष्ट्ये आहेत. यामुळे केवळ कामगारांचे कल्याणच होणार नाही, तर संपूर्ण औद्योगिक वातावरणात एक प्रकारची सुसूत्रता आणि शिस्त येण्यास मदत होईल.

विशेष म्हणजे, बदलत्या काळानुसार ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर काम करणाऱ्या गिग वर्कर्सच्या सुरक्षेचा विचारही या नियमावलीत प्राधान्याने करण्यात आला आहे. ही नवीन नियमावली राज्यातील औद्योगिक आस्थापनांपासून ते बांधकाम क्षेत्रापर्यंत आणि असंघटित कामगारांपर्यंत सर्वांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.

कामगार मंत्र्यांनी स्पष्ट केले की, ही नियमावली अंतिम करण्यापूर्वी लोकशाही मार्गाने सर्वांचे मत जाणून घेणे आवश्यक आहे. त्यामुळेच राज्यातील सर्व औद्योगिक आस्थापना, बांधकाम व्यावसायिक, विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्म चालविणाऱ्या कंपन्या, गिग वर्कर, सर्व कामगार संघटना आणि वैयक्तिक स्तरावरील नागरिक यांनी या मसुद्याचा सखोल अभ्यास करावा. अधिसूचनेद्वारे दिलेला कालावधी संपुष्टात येण्यापूर्वी आपल्या हरकती व सूचना सादर कराव्यात. सर्वांच्या सहभागातून एक सर्वसमावेशक आणि न्याय्य नियमावली तयार होऊन राज्याच्या औद्योगिक विकासाला नवी गती मिळेल, असा विश्वास ?ड. आकाश फुंडकर यांनी यावेळी व्यक्त केला.



# मे त्वचा कर्करोग जागृती महिना

मे महिना हा त्वचा कर्करोग जागृती म्हणून पाळला केला जातो. या महिन्यात त्वचेच्या कर्करोगाबद्दल जनजागृती करून त्याची लक्षणे, कारणे, प्रतिबंध आणि उपचार याबाबत व्यापक माहिती लोकांपर्यंत पोहोचवली जाते. वाढत्या उन्हाळ्यात सूर्यप्रकाशाचा संपर्क जास्त होत असल्याने या काळात त्वचेचे संरक्षण करणे अत्यंत आवश्यक ठरते.

**त्वचा कर्करोग म्हणजे काय -** त्वचा कर्करोग हा त्वचेतील पेशींमध्ये अनियंत्रित वाढ होऊन तयार होणारा कर्करोग आहे. प्रामुख्याने तो सूर्याच्या अतिनील किरणांमुळे होतो.

**कारणे आणि जोखीम घटक -** त्वचा कर्करोग होण्यामागे अनेक कारणे आहेत, त्यातील प्रमुख पुढीलप्रमाणे— १) सूर्याच्या ळञकिरणांचा दीर्घकाळ संपर्क २)वारंवार सनबर्न होणे ३)गोरी त्वचा किंवा संवेदनशील त्वचा ४)कुटुंबात त्वचा कर्करोगाचा इतिहास ५)रासायनिक पदार्थांचा संपर्क ६) रोगप्रतिकारक शक्ती कमी असणे

**लक्षणे -** त्वचा कर्करोगाची लक्षणे सुरुवातीला किरकोळ वाटू शकतात, परंतु त्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते— १)त्वचेवर नवीन गाठ, डाग किंवा असामान्य बदल २)तीळाचा आकार, रंग, जाडी किंवा कडा बदलणे ३)न भरून येणारी जखम किंवा वारंवार रक्त येणे ४)त्वचेवर खाज, जळजळ किंवा वेदना ५)एखादा डाग मोठा होणे किंवा रंग बदलणे

**प्रतिबंधात्मक उपाय :** त्वचा कर्करोग टाळण्यासाठी काही सोपे पण प्रभावी उपाय करता येतात—

१)सनस्क्रीनचा वापर: सनस्क्रीन वापरणे २)संरक्षणात्मक कपडे: पूर्ण बाह्यांचे कपडे, टोपी आणि सनग्लासेस वापरणे ३)उन टाळणे: सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत थेट सूर्यप्रकाशात जाणे टाळणे ४)नियमित तपासणी: त्वचेतील बदल लक्षात ठेवणे आणि संशयास्पद लक्षणे दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणे.

**लवकर निदानाचे महत्त्व -** त्वचा कर्करोग लवकर टप्प्यात ओळखल्यास त्यावर उपचार करून पूर्ण बरे होण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे 'ABCDE नियम' लक्षात ठेवणे उपयुक्त ठरते. १) A(Asymmetry): तीळ सममित नसणे २)B(Border): कडा अनियमित असणे ३)C(Color): रंगात बदल दिसणे ४)D (Diameter): आकार वाढणे ५)E (Evolving): सतत बदल होणे आजच्या बदलत्या जीवनशैलीत आणि वाढत्या तापमानामुळे त्वचा कर्करोगाचा धोका वाढत आहे. त्यामुळे प्रत्येकाने स्वतःची आणि कुटुंबाची काळजी घेणे गरजेचे आहे. त्वचा कर्करोग हा गंभीर आजार असला तरी योग्य काळजी, जागरूकता आणि वेळेवर निदान केल्यास तो पूर्णपणे नियंत्रणात ठेवता येतो. म्हणूनच प्रत्येक नागरिकाने सूर्यप्रकाशापासून संरक्षण करणे, त्वचेतील बदलांकडे लक्ष देणे आणि वेळेवर वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे. मे महिन्यातील या जनजागृती उपक्रमात सहभागी व्हावे आणि त्वचा कर्करोगापासून स्वतःचे संरक्षण करावे.

**बाळासाहेब घुगे**
जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी

# सुपर वुमन ! तीन एकर शेतात खजूर, ड्रॅगन फ्रुट आणि सफरचंदाची लागवड!

**बीड :** 'शेती' व्यवसाय करण्यास सध्याची तरुण पिढी नकार देत आहे. अस्मानी संकट, शेती मालाला योग्य बाजारभाव न मिळणे आणि भांडवलासाठी लागणारा पैसा यामुळे शेती करण्यास तरुण इच्छूक नाहीत असं म्हंटलं जातं.

तर काही लोक आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीमध्ये विविध प्रकारचे प्रयोग करत आहेत. परंतु बीडच्या एक महिला शेतकरी खजूर, ड्रॅगन फ्रुट आणि सफरचंदची शेती करून लाखो रुपयांचे उत्पन्न घेत आहे. विशेष म्हणजे बीड हा दुष्काळी जिल्हा असून देखील त्यांनी अतिशय रित्या शेतीचे नियोजन केलं आहे.

### तीन एकर क्षेत्रात विविध पिकांची लागवड



विजया गंगाधर घुले असं महिला शेतकऱ्याचे नाव असून त्या बीड जिल्ह्यातील आष्टी येथील रहिवाशी आहेत. विजया घुले यांनी पारंपरिक शेतीला फाटा देत योग्य मिश्र शेती करण्याचा निर्णय घेतला. २०१६ मध्ये सुरवातीला विजया घुले यांनी अर्धा एकर ड्रॅगन फ्रूटची लागवड करण्याचा निर्णय घेतला होता. नंतर कालांतराने खजूर आणि सफरचंदाची लागवड करण्याचा निर्णय घेतला. विजया यांनी खजूरची ८० झाडे तर सफरचंदचे २४० झाडे लावलेले आहेत. म्हणजे एकूण तीन एकर क्षेत्र हे मिश्र पिकासाठी गुंतवले आहे. महत्वाची गोष्ट म्हणजे या तिनही पिकांमधून त्यांना भरघोस उत्पन्न मिळत आहे.

### खजुरातून मिळाले अडीच लाखांचे उत्पन्न

सध्या खजूर पिकाचे उत्पादन सुरू झाले असून त्यातून चांगला आर्थिक फायदा होत असल्याचं विजया यांनी सांगितले आहे. प्रत्येक झाडापासून पहिल्याच वर्षी ७० किलो ते १२० किलोपर्यंत फळे मिळाली असून तो बाजारपेठेत ७० ते १०० रुपये दराने विक्री केला. तर किरकोळ बाजारांमध्ये १६० ते २०० रुपयांपर्यंत खजूरची विक्री केली. खजूराच्या ८० झाडापासून पहिल्याच वर्षे अडीच ते तीन लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. तर पुढील वर्षी प्रती झाड दीडशे ते पावणे दोनशे किलो पर्यंत खजूर मिळणे अपेक्षित आहे.

### पुढील वर्षी दहा लाखांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा

पुढच्या वर्षी तीन एकर क्षेत्रामधून कमीत कमी २० ते २५ लाखांचे उत्पन्न मिळेल अशी अपेक्षा त्यांनी विजया यांनी व्यक्त केली आहे. ड्रॅगन फ्रूटचे चार ते पाच लाख रुपये उत्पन्न तसेच खजूरचे चार ते पाच लाख रुपये उत्पन्न असे एकाच एकरामध्ये कमीत कमी दहा लाखापर्यंत उत्पन्न मिळण्याचे अपेक्षा आहे.


### जिजामाता कृषी भूषण पुरस्काराने सन्मान

राज्यातील तसेच देशभरातील शेतकऱ्यांनी मिश्र शेतीकडे वळले तर त्यांनाही शाश्वत उत्पन्नाचा मार्ग मिळेल. अतिशय कमी कष्टात कसलाही रासायनिक स्प्रे चा वापर न करता येणारी ही शेती असल्यामुळे ते भविष्यात नेहमीच फायद्याची ठरणार आहे. विजया घुले यांच्या यशस्वी प्रयोगाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाने २०२२ - २३ चा जिजामाता कृषी भूषण पुरस्कार देऊन विजया घुले यांचा सन्मान केला आहे.

## दिन विशेष

# रवींद्रनाथ टागोर : नोबेल पारितोषिक मिळविणारे पहिले गैरयुरोपीय!

आज जयंती



रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ रोजी झाला.त्यांना गुरुदेव असे ही संबोधले जाते, हे एक ब्राह्मोपंथीय, चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगीतकार आणि समाजसुधारक होते.१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी यांच्या कार्यामुळे बंगाली साहित्य व संगीतात आमूलाग्र बदल घडून आला.

अतिशय लोकप्रिय कविता असलेल्या गीतांजलीचे ते कवी होते, ज्याचे वर्णन 'अगदी संवेदनशील, ताजे आणि सुंदर' कविता असे केले जाते. ते १९१३ मध्ये नोबेल पारितोषिक जिंकणारे जगातील पहिले गैर-युरोपियन आणि साहित्यातील पहिले गीतकार बनले. बंगाली साहित्यावर रवीन्द्रनाथांचा एवढा प्रभाव आहे की, बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रवींद्रोत्तर अशी विभागणी करण्यात येते. त्यांना कधीकधी 'बंगालचा बार्ड' म्हणून संबोधले जाते. तसेच ते अत्यंत प्रतिष्ठित रॉयल एशियाटिक सोसायटीचे सदस्य होते. कोलकात्याच्या पिराली ब्राह्मण कुटुंबात जन्म झालेल्या रवीन्द्रनाथांनी वयाच्या ८व्या वर्षी पहिली कविता लिहिली. ७. वयाच्या १६व्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपणनावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. १८७७ पर्यंत त्यांनी त्यांच्या खऱ्या नावाने लघुकथा आणि नाटके प्रकाशित केली. एक मानवतावादी, सार्वभौमवादी, आंतरराष्ट्रीयवादी म्हणून त्यांनी ब्रिटिश राजवटीचा विरोध केला.

विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होते. पारंपरिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला. रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांग्लादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे पृथ्वीवरील एकमेव कवी आहेत. श्रीलंकेचे राष्ट्रगीतही त्यांच्या साहित्यातून प्रेरणा घेऊन तयार झाले.

कोलकात्याच्या जोराशंका ठाकूर बाडी येथे रवींद्रनाथ टागोर (टोपणनाव रवि) यांचा जन्म झाला. वडील देवेन्द्रनाथ टागोर व आई शारदा देवी यांच्या १४ अपत्यांमध्ये रवींद्रनाथ हे १३वे होत.११व्या वर्षी मुंज झाल्यावर रवींद्रनाथांनी वडिलांसोबत १४ फेब्रुवारी १८७३ रोजी भारतभ्रमणार्थ कलकत्ता सोडले. या भ्रमंतीत त्यांनी विविध ठिकाणे पाहिली. वडिलांची शांतिनिकेतन येथील मालमत्ता (येथे आता आजचे विश्वभारती विद्यापीठ आहे), अमृतसर व हिमालयातील थंड हवेचे ठिकाण डलहौसी इत्यादी. येथे रवींद्रनाथांनी विविध व्यक्तींची आत्मचरित्रे वाचली, इतिहास, खगोलशास्त्र, विज्ञान , कालिदासाचे काव्य व संस्कृत आदींचे अध्ययन केले. १८७७ साली प्रकाशित झालेल्या रचनांमुळे रवींद्रनाथ प्रथम लोकांसमोर आले. यात मैथिली कवीच्या विद्यापतीप्रवर्तित शैलीत रचलेल्या काही दीर्घ कविता होत्या. विनोदाने रवींद्रनाथांनी प्रथम ह्या भानुसिंह नामक वैष्णव कवीने १७व्या शतकात रचलेल्या व नंतर गहाळ झालेल्या रचना आहेत, असा आविर्भाव केला व नंतर त्यांचे कवित्व मान्य केले. याच काळात त्यांनी संध्या-संगीत, बंगाली भाषेतील पहिली लघुकथा 'भिकारिणी' व सुप्रसिद्ध कविता 'निर्झरेर स्वप्नभंग' आदी रचना लिहिल्या. बॅरिस्टर होण्यासाठी त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेज येथे प्रवेश घेतला परंतु १८८० मध्ये कोणत्याही पदवीशिवाय ते बंगालला परतले. ९-नोव्हेंबर-१८८३ रोजी त्यांनी मृणालिनी-देवी(जन्मनाव भावतारिणा यांच्याशी विवाह केला. या विवाहापासून त्यांना पाच अपत्ये (पैकी दोघांचा बालमृत्यू) झाली. १८९० साली रवींद्रनाथांनी सध्याच्या बांग्लादेशातील सियाल्दा येथील टागोर घराण्याची मालमत्ता सांभाळण्यास सुरुवात केली. त्यांची पत्नी व मुले १८९८ साली येथे त्यांच्यासोबत आली. या काळात ते जमीनदार बाबू या नावाने ओळखले जात होते.

**जन्म नाव -**
रवींद्रनाथ देवेंद्रनाथ टागोर
**टोपणनाव -** गुरूदेव
जन्म - मे ७, १८६१
कोलकाता, भारत
मृत्यू - ७ ऑगस्ट,
१९४१ (वय ८०)
कोलकाता, भारत
**कार्यक्षेत्र -** साहित्य, संगीत, तत्त्वज्ञान, नाटक

**भाषा -** बंगाली
**साहित्य प्रकार -**
कविता, नाटक
प्रसिद्ध साहित्यकृती - जन गण मन, गीतांजली
**वडील -** देवेंद्रनाथ टागोर
**आई -** सरला देवी
**पत्नी -** मृणालिनी देवी
**पुरस्कार -** साहित्यातील नोबेल पारितोषिक (१९१३)



# लेडी विथ लॅम्प : मदर तेरेसा

***या जगामध्ये जवळजवळ सगळेच व्यक्ती हे आपल्या स्वतःसाठी जगतात. पण काही असेही व्यक्ती असतात की, जे आपले सर्व जीवन परोपकारांमध्ये व दुसऱ्यांसाठी जगत राहतात.***

***मदर तेरेसा या पण अशाच महान व्यक्ती होत्या, ज्यांनी की आपले पूर्ण जीवन हे दुसऱ्यांसाठीच घालवले. ज्यांचे हृदय हे संसारातील दिन- दलितांसाठी, आजारी व्यक्तींसाठी, असाह्य आणि गरिबांसाठी तळमळ करायचे. यामुळे त्यांनी त्यांचे पूर्ण जीवन त्यांच्या सेवा व भलाई मध्येच घालवले. मानवता आणि त्याच्या शांतीसाठी स्वतःला समर्पित केले. त्यांना बरेच पुरस्कार देऊन सन्मानित ही केलेले आहे. ज्यामध्ये त्यांना नोबेल पीस प्राईस हा पुरस्कार मिळाला होता. त्या सोबतच कोलकत्याची भाग्यवान तेरेसा या नावाची उपाधी ही भेटली होती.***

मदर तेरेसा यांचा जन्म २६ ऑगस्ट १९१० स्कोप्जे, मॅसेडोनिया या शहरात मध्ये झाला होता. त्यांचे खरे नाव अगनेस गोंझा बोयाजीजू हे होते. त्यांचे वडील निकोला बोयाजू हे साधारण व्यापारी होते. जेव्हा मदर तेरेसा या आठ वर्षाच्या होत्या त्यावेळेस त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते. त्यानंतर त्यांच्या पालनपोषणाची सर्व जबाबदारी ही त्यांची आई द्रोणा बोयाजु यांच्या वरती आली.

लहानपणापासून त्यांना धार्मिक व सामाजिक प्रचाराबद्दल गोष्टी ऐकायला खूप आवडायच्या. त्यामुळे फक्त बारा वर्षाच्या असताना त्यांनी निर्णय घेतला होता की- मी माझे पूर्ण जीवन हे समाजासाठीच समर्पित करेल आणि अठरा वर्षाच्या असताना त्यांनी 'सिस्टर ऑफ लेरॅट्टो' यामध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. १५ ऑगस्ट १९२८ मध्ये त्यांनी या क्रांतिकारी अभियानाची सुरुवात केली होती. त्यानंतर १९२९ मध्ये मदर तेरेसा या भारतामध्ये आल्या आणि त्यांनी दार्जिलिंग येथे शिक्षण मिळवले. तेथेच हिमालयातील डोंगराजवळ संत तेरेसा स्कूलमध्ये बंगाली शिकल्या आणि मुलांना शिकवायला लागल्या. शाळेत शिकवत असताना त्यांची सारखी नजर ही खिडकीतून बाहेर असलेल्या झोपडपट्टीत राहणाऱ्या गरीब लोकांकडे जात असत. हे सर्व पाहून त्यांचे मन हे दुःखाने भरून जात असे. त्या लोकांची ही दशा पाहून त्यांच्या मनात सेवेचा भाव उत्पन्न होत होता.

मदर तेरेसा या २४ वर्षाच्या असताना १९३१ मध्ये अग्निसनन बनल्या आणि त्यावेळेस त्यांनी आपले मूळ नाव बदलून मदर तेरेसा हे नाव ठेवले. त्यांनी स्वतः लिहिले आहे की - तो दहा सप्टेंबर १९४० चा दिवस होता, जेव्हा मी वार्षिक सुट्टीसाठी दार्जिलिंगला चाललेले होते.

त्याच वेळेस माझ्या अंतर्मनातून एक आवाज आला की, मला सगळे काही सोडून या गरिबांची सेवा केली पाहिजे आणि सेवा करता करता शरीराला त्यागलं पाहिजे. सन १९४३ मध्ये शहरांमध्ये मोठ्या संख्येने लोक मारले गेले. लोक तसेपण गरीबीमुळे बेहाल होते की, काही वर्षानंतर १९४६ मध्ये हिंदू- मुस्लिम दंगलीने कोलकत्ता शहराची स्थिती अधिकच भयानक बनली होती. अशा परिस्थितीत मदर तेरेसा यांनी लोकांची खूप सेवा केली. ०७ ऑक्टोबर १९५० रोजी त्यांना व्हॅटिकल मधून मिशनरीज ऑफ चॅरिटीची स्थापना केली. या संस्थेचा उद्देश भुकेलेल्या, निवस्त्र असलेल्या, बेघर लोकांसाठी, आंधळ्यांसाठी सेवा करणे हाच होता. ज्यांना समाजामध्ये काही जागा नव्हती अशा लोकांना स्थान देण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांनी निर्मळ हृदय व निर्मळ शिशु भवन या नावाचे आश्रम उघडले. निर्मळ हृदय याचा उद्देश रोगांनी पिढीत असलेले लोक व गरिबांची सेवा करणे हा होता. तर निर्मळ शिशु भवन याची स्थापना अनाथ आणि बेघर असलेल्या मुलांसाठी केली होती. भारत सरकारने त्यांना १९६२ मध्ये 'पद्मश्री' व नंतर भारतीय सर्वोच्च नागरीक सन्मान 'भारतरत्न' देऊन सन्मानित केले. मानवी कल्याणासाठी केलेल्या कार्यामुळे मदर तेरेसा यांना १९७९ मध्ये नोबेल शांती सन्मानही देण्यात आला होता. परंतु नोबेल पुरस्काराची एक लाख ९२ हजाराची राशी त्यांनी गरिबांसाठी फंड म्हणून वापरली.

४५ वर्षापर्यंत गरीब, आजारी, अनाथ आणि मरत असलेल्या लोकांची मदत त्यांनी केली आणि सोबत चॅरिटीचा प्रचार ही केला. गरिबांसाठी त्या रस्त्यावरती बिना चपलीच्याच चालायच्या. हार्ट अटॅक आल्यामुळे ०५ सप्टेंबर १९९७ रोजी त्यांचे निधन झाले. मदर तेरेसांनी मिशनरी ऑफ चॅरिटीचे काम शेवटपर्यंत चालूच ठेवले होते. आणि त्यांच्या मृत्यूपर्यंत त्यांनी ६१० मिशन १२३ देशांमध्ये नियंत्रित केलेल्या होत्या. मिशनरी ऑफ चॅरिटीची सुरुवात फक्त १३ लोकांसोबत झालेली होती परंतु त्यांच्या मृत्यूच्या वेळेस ४००० पेक्षाही जास्त बहिणी जगभर गरज असलेल्या लोकांची मदत करत होत्या. स्वतःच्या स्वागतासाठी दिलेल्या भाषणांमध्ये मदत तेरेसा यांनी स्पष्ट म्हटले आहे की- शब्दांमधून मानवसेवा होत नाही, त्यासाठी पूर्ण मन लावून काम करणे गरजेचे आहे. त्यांनी ही पण घोषणा केली होती की -कोणत्याही प्रकारच्या स्वागत समारंभामध्ये मी भाग घेणार नाही आणि सतत सेवा कार्यामध्येच व्यस्त राहील. आणि त्या म्हटल्या होत्या की-

'खूबसूरत लोग हमेशा अच्छे नही होते,
लेकिन अच्छे लोग हमेशा खूबसूरत होते है!

म्हणजे सुंदर असणारे लोक चांगलेच असतील असं काही नाही, पण चांगले असणारे लोक मात्र नक्कीच सुंदर असतात.

# साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# वाढत्या तापमानामुळे आरटीओ कामकाजाच्या वेळेत बदल

**अकोला :** जिल्ह्यातील वाढत्या तापमानामुळे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या (आरटीओ) कामकाजाच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. शुक्रवार, दि. ८ मेपासून पक्की अनुज्ञप्ती, वाहनांची योग्यता प्रमाणपत्रे, नवीन वाहन नोंदणी तसेच जुन्या वाहनांच्या पुनर्नोंदणी संबंधी कामकाज सकाळी ७.३० ते दुपारी १२.३० या वेळेत करण्यात येणार आहे.

अकोला जिल्ह्यातील सर्व वाहनधारकांनी या बदललेल्या वेळेची नोंद घ्यावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून करण्यात आले आहे. सध्या शहराचे तापमान कमी झाले असले तरी उन्हाच्या झळा मात्र मोठ्या प्रमाणात बसत आहेत. यामुळे कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना उन्हाचा फटका बसण्याची शक्यता लक्षात घेऊन हा बदल केला आहे.

# अकोल्यातून 'लोकल टू ग्लोबल'ची हाक

## विज्ञान-तंत्रज्ञानाच्या नव्या पर्वाची नांदी - डॉ. अनिल काकोडकर


प्रतिनिधी ७ मे

**अकोला :** 'विज्ञान हे केवळ प्रयोगशाळांपुरते मर्यादित न राहता उद्योग, समाज आणि राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत उतरले पाहिजे. स्थानिक स्तरावर निर्माण होणारी नवकल्पना जागतिक स्तरावर पोहोचवण्याची क्षमता आपल्यात आहे,' असे ठाम प्रतिपादन ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांनी अकोल्यातील दौऱ्यात केले.

अकोला एज्युकेशन सोसायटीच्या पुढाकारातून उभारण्यात येणाऱ्या अकोला डिस्ट्रिक्ट इनोव्हेशन अँड सायन्स ॲक्टिव्हिटी सेंटरच्या किट्स या प्रगत तंत्रज्ञान संस्थेला सदिच्छा भेट दिली. यावेळी 'किट्स'मधील इंडस्ट्रियल ऑटोमेशन, रोबोटिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सेवांचे सादरीकरण करण्यात आले.

मार्गदर्शन करताना डॉ. काकोडकर म्हणाले, 'सेन्सर्स, एआय आणि ऑटोमेशन ही भविष्यातील औद्योगिक क्रांतीची मूळ साधने आहेत. अकोल्यासारख्या शहरांतून जर ही तंत्रज्ञाननिर्मिती झाली, तर 'लोकल टू ग्लोबल'चा प्रवास अधिक वेगाने शक्य होईल.' त्यांनी पुढे सांगितले की,

'मोठ्या शहरांपुरते तंत्रज्ञान मर्यादित ठेवण्याची गरज नाही. 'स्मार्ट सिटी'सोबतच 'स्मार्ट स्मॉल सिटी' ही संकल्पना राबवली, तर भारताच्या सर्वांगीण विकासाला चालना



मिळेल. सरकारी उत्कृष्टता केंद्रांशी सहकार्य करून स्थानिक उद्योगांनी संशोधन आणि उत्पादन यांचा मजबूत दुवा निर्माण करावा.'

या भेटीदरम्यान राजेश्वर देशपांडे, शार्दुल दिगंबर, सप्रे, भास्कर आणि अमित सबनीस यांची उपस्थिती होती. अकोल्यात विज्ञान केंद्राचे भूमीपूजन आणि 'किट्स'मधील तांत्रिक पाहणी यामुळे जिल्ह्याच्या शैक्षणिक व औद्योगिक विकासाला नवे बळ मिळणार असून, अकोला 'लोकल'पासून 'ग्लोबल'कडे वाटचाल करणारे तंत्रज्ञान हब बनण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

### 'किट्स'च्या कार्याचे केले कौतुक

'विज्ञान संशोधन केंद्रांत जन्माला येते, पण त्याचे खरे उपयोजन 'किट्स'सारख्या उद्योगांमध्ये होते. अकोल्यात एआय आणि रोबोटिक्सवर आधारित सेवा विकसित होत असल्याचे पाहून समाधान वाटते. हीच दिशा भारताला तंत्रज्ञान क्षेत्रात आत्मनिर्भर बनवेल.'

## तालुकास्तरीय मूल्यमापन समितीवर सदस्यपदी प्रशांत विखे



**तेल्हारा :** मुख्य मंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सन-२०२५-२०२६ या आर्थिक वर्षात गठित तेल्हारा तालुकास्तरीयमूल्यमापन समितीवर सदस्य म्हणून तेल्हारा येथील पत्रकार प्रशांत मनोहर विखे यांची नियुक्ती करण्यास आली आहे. या मूल्यमापन समिती तालुका वरखेड जिल्हा नागपूर येथील एकूण ग्रामपंचायतीमधील २० टक्के ग्रामपंचायतींची तपासणी दिलेल्या कालावधीत मूल्यमापन पूर्ण करणार आहे. प्रशांत विखे यांच्या नियुक्तीचे पत्रकारांनी तसेच त्यांच्या चाहत्यांनी स्वागत केले आहे.

## शिक्षण हा प्राकृतिक संस्कार - निलेश महाराज जाणे



**अकोट :** आपण प्राप्त केलेली विद्या केवळ परीक्षेकरिता नसून ती कायम आपल्या जीवनामध्ये स्थिर व्हावी त्याकरिता संयमी जीवनाची नितांत आवश्यकता आहे. अलीकडच्या काळात मात्र शिक्षणापेक्षा प्रशिक्षणावरच जास्त भर दिल्या जातो आहे. वास्तविक पाहता पुर्विच्याकाळी प्रशिक्षण पद्धती ही सर्कशीतील मनुष्येत्तर प्राण्यांकरिताच वापरल्या जाऊन त्या माध्यमातून त्यांच्याकडून मनुष्यवत कामे करून घेत लोकांची करमणूक केल्या जात होती. आता मात्र ती माणसांकरिता वापरून त्यांच्याकडून जनावरांसारखी कामे करून घेतल्या जात आहेत.प्रशिक्षण ही कृत्रिमता असून , शिक्षण हा प्राकृतिक संस्कार असल्याचे अभ्यासपुर्ण मत भागवताचार्य निलेश महाराज जाणे यांनी मांडले. ते आज श्री संत वासुदेवजी महाराज स्मृती मंदिर श्री ज्ञानेश आश्रम वारी भैरवगढ येथे भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी आयोजित केलेल्या श्री माऊली सर्वांगीण विकास बालसंस्कार शिबिरातील विद्यार्थ्यांना अध्यात्मविषयक मार्गदर्शन करतांना बोलत होते. ते पुढे म्हणाले की भीषण पाणीटंचाईच्या काळात एखादी विहीर दुसरीकडून आणलेल्या पाण्याने भरणे म्हणजे प्रशिक्षण आणि ती विहीर खोदून त्यात जिवंत पाण्याचा झरा निर्माण करणे म्हणजे शिक्षण होय. अलीकडच्या काळात बोकाळलेला भ्रष्टाचार हा प्रशिक्षण प्रणालीचे अनौरस अपत्य आहे. कारण अशिक्षिताला भ्रष्टाचार करता येत नाही , करायचाच झाल्यास तो केवळ श्रमाची बचतच करू शकतो.आणि जो सुशिक्षित आहे तो ते दुष्कृत्य करीत नाही. म्हणून भ्रष्टाचार सुशिक्षित किंवा अशिक्षित नव्हे तर , ज्यांचे रग्गड पगाराने पोट तर भरलेले आहे परंतु कधीही न संपणारी हाव असल्याने भूक मात्र अजून पर्यंत झालेली नाही अशा प्रशिक्षितांची उपज आहे. प्रशिक्षणाच्या माध्यमातून अनियंत्रित हातात गेलेली शक्ती ही विश्वाच्या विकासाकरिता नाही तर, विनाशाकरिता कारणीभूत होत आहे.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान मूल्यमापन समितीवर विजय शिंदे



**अकोट :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान पुरस्कार मुल्यमापन समितीवर अकोला जिल्हा पत्रकार संघाचे सचिव तथा अकोट येथील पत्रकार विजय मनोहरराव शिंदे यांची नियुक्ती करण्यास आली आहे. अकोट पंचायत समितीच्या गठीत या मूल्यमापन समितीला वर्धा जिल्ह्यातील कारंजा पंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायती मधील कामकाजाचे पुरस्कारासाठी मूल्यमापन करावे लागणार आहे. या समितीचे अध्यक्ष गटविकास अधिकारी रमाकांत माळी असुन या समितीमध्ये विस्तार अधिकारी (कृषी), विस्तार अधिकारी (पंचायत), अगंणवाडी पर्यवेक्षिका, संगणक परिचालकव तालुका पत्रकार अशा चार सदस्यांचा समावेश आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' हे महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाद्वारे राबविण्यात येणारा एक अत्यंत महत्त्वाकांक्षी कार्यक्रम आहे, जो २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून राबविला जात आहे.

# शेतकऱ्यांकडील कापूस संपल्यानंतर उच्चांकी दर!

## शेतकऱ्यांमध्ये निराशा, आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडींचा परिणाम



प्रतिनिधी ७ मे

**अकोला :** आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी, खाद्यतेलाच्या दरातील वाढ आणि पॉलिस्टर उद्योगावर झालेल्या परिणामामुळे कापसाच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवारी अकोल्यातील खासगी बाजारात कापसाला किमान ८,००० ते कमाल ९,५०० रुपये प्रतिक्विंटल असा आतापर्यंतचा उच्चांकी दर मिळाला आहे. यामुळे कमी दरात कापूस विकलेल्या शेतकऱ्यांमध्ये निराशेचे वातावरण पसरले आहे.

गत खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे देशांतर्गत कापूस उत्पादनात घट झाली. त्याच वेळी आखाती प्रदेशातील तणावामुळे कच्च्या तेलाचे (क्रूड ऑइल) दर वाढले, परिणामी पॉलिस्टर उत्पादन महागले. यामुळे कापसाला पर्याय म्हणून मागणी वाढली. तसेच खाद्यतेलाच्या दरवाढीमुळे सरकीला उठाव मिळाल्याने त्याचाही सकारात्मक परिणाम कापसाच्या दरावर झाला आहे. दरम्यान, बाजारात कापसाची आवक मर्यादित आहे. साठवणुकीची जोखीम लक्षात घेता बहुतांश लहान शेतकऱ्यांनी यापूर्वीच कापूस विक्री केला असून, सध्या मोठ्या शेतकऱ्यांकडेच साठा आहे. परिणामी, दरवाढीचा लाभ सर्वसामान्य शेतकऱ्यांना मर्यादित प्रमाणात मिळत असल्याचे चित्र आहे. बहुतांश कापूस भारतीय कापूस महामंडळ (सीसीआय) कडे विकला गेल्याने खुल्या बाजारातील उपलब्धता कमी झाली आहे.

### अशी आहेत दरवाढीमागील कारणे

कापूस दरवाढीमागे अनेक घटक कारणीभूत ठरत आहेत. जागतिक स्तरावर खाद्यतेलाच्या दरात वाढ झाल्याने कापसावर झाला. तसेच, क्रूड ऑइल महागल्याने पॉलिस्टर उत्पादन खर्च वाढला आणि कापसाच्या कापडाला मागणी वाढली. सरकीचे भाव वाढल्याचा थेट परिणाम कापसाच्या दरावर झाला आहे. गेल्या दीड महिन्यापासून कापसाच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. सुरुवातीला सुमारे ७,००० रुपयांच्या आसपास असलेले दर आता २,००० रुपयांच्या पुढे गेले आहेत. जागतिक तणावामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली असून, भारतातील कापसाला परदेशातूनही मागणी वाढत असल्याचे व्यापारी सूत्राचे म्हणणे आहे.

# मनपाव्दारा दक्षिण झोन येथील मनपा मराठी शाळा क्र. १४ येथील मालमत्तेचा ताबा



**अकोला :** अकोला महानगरपालिका क्षेत्रातील दक्षिण झोन अंतर्गत सिंधी कॅम्प स्थित असलेल्या मनपा मराठी शाळा क्र. १४ येथील इमारत ८८.७४ चौ.मि. राजमाता चैरीटेबल सोसायटी यांना २००९ साली शर्ती व अटी नुसार देण्यात आली होती. सदर सोसायटीचा करारनामा संपुष्टात आल्यामुळे मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा मालमत्ता विभागाचे सहा. नगररचनाकार संदीप गावंडे यांच्या मार्गदर्शनात आज दि. ६ मे रोजी सदरची मालमत्ताचा ताबा मनपाव्दारा घेण्यात आला आहे.

या कारवाईत अतिक्रमण निर्मुलन पथक, मालमत्ता विभाग व दक्षिण कार्यालयामार्फत करण्यात आली असून या कारवाईत सहा.अतिक्रमण निर्मुलन अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, कनिष्ठ अभियंता निरज वगारे, अभिषेक निशाने, गौरव बडे, प्रतीक कट्यारमल, सुरक्षा रक्षक रितेश इंगळे, गुलाम मुस्तफा आदींची उपस्थिती होती.

# अकोल्यातील नर्सिंग महाविद्यालयाचे श्रेणीवर्धन


प्रतिनिधी ७ मे

**अकोला :** राज्यातील आरोग्य सेवा आणि वैद्यकीय शिक्षण अधिक सक्षम व आधुनिक करण्यासाठी जपानच्या आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्थेच्या आर्थिक साहाय्याने राबविण्यात येणाऱ्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत अकोल्यातील शासकीय नर्सिंग महाविद्यालयाचे श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी ३ हजार ७०८ कोटी रुपयांच्या आर्थिक साहाय्याला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

महाराष्ट्राच्या विकास प्रवासात विविध क्षेत्रांत योगदान देणारी जपानची आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था आता राज्याच्या वैद्यकीय क्षेत्रातही सहकार्य करणार आहे. राज्यातील वैद्यकीय सेवा अधिक परिणामकारक करण्यासाठी नवीन नर्सिंग व पॅरामेडिकल महाविद्यालयांची स्थापना, प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मिती, तसेच आरोग्य व्यवस्थापन प्रणाली अधिक कार्यक्षम करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. 'महाराष्ट्रातील तृतीयस्तरीय आरोग्यसेवा, वैद्यकीय शिक्षण व्यवस्था आणि नर्सिंग प्रणाली बळकटीकरण' या प्रकल्पांतर्गत वैद्यकीय महाविद्यालये, नर्सिंग महाविद्यालये आणि संलग्न रुग्णालयांच्या पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. या प्रकल्पांतर्गत अकोला, धुळे, सोलापूर, अंबाजोगाई, नागपूर, धाराशिव, रत्नागिरी, पालघर, तसेच मुंबईतील प्रमुख नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन होणार आहे.

# बाबू जगजीवनराम कनिष्ठ महाविद्यालयाचा बारावी निकाल ९४ टक्के

## विज्ञान शाखेचा १०० टक्के निकाल



**अकोट :** शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या बाबू जगजीवनराम कनिष्ठ महाविद्यालय तथा वरिष्ठ प्राथमिक मराठी शाळेने यंदाच्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९४ टक्के लागला असून विज्ञान शाखेचा १०० टक्के, वाणिज्य शाखेचा ९५ टक्के तर कला शाखेनेही उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विज्ञान शाखेत कु. श्रेया गोपाल धुमाळे व अस्मा उरूस मो. खालिद यांनी ९१.३३ टक्के गुण मिळवत संयुक्त प्रथम क्रमांक पटकावला. सइमा फिरदोस अ. खालिद हिने ८७.१७ टक्के गुणांसह द्वितीय, तर कु. सौम्या अमित पितांबरवाले हिने ८६.१७ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. तसेच फिशरी विषयातून काजमा देशमुख (८५.६७ टक्के ) प्रथम व अर्णव नितीन शेगोकार (८५.१७टक्के ) द्वितीय ठरले. विशेष म्हणजे श्रेया धुमाळे व आस्था संजय खंडारे यांनी गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत विशेष प्राविण्य मिळवले.

वाणिज्य शाखेत कु. खुशी हनुमानदास सोनी हिने ८६.८३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. प्रांजली विनोद दिवनाले(८३.६७टक्के )द्वितीय, तर कु. विदिशा हेमल ठाकर (८३.३७टक्के )तृतीय क्रमांकावर राहिली. कला शाखेत कोमल राहुल रायबोले हिने प्रथम, तर आदित्य उमेश दांडगे याने द्वितीय क्रमांक मिळवला. यंदा महाविद्यालयातून १७८ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी २८ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवले, तर ६० विद्यार्थ्यांनी ६० टक्क्यांपेक्षा जास्त गुणांसह उत्तीर्ण होत यश संपादन केले.

## हिदायत पटेल हत्याकांड प्रकरण

# आरोपीचा जामीन अर्ज न्यायालयाकडून फेटाळला



**अकोट :** काँग्रेस नेते हिदायतउल्ला पटेल हत्याकांड प्रकरणातील आरोपीचा जामीन अर्ज अकोट येथील न्यायालयाने फेटाळला आहे. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. आर. पटारे यांनी ६ मे रोजी हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला. या प्रकरणातील आरोपी अब्दुल अन्सार ऊर्फ अंटू अब्दुल गफ्फार (रा. उर्दू स्कूलजवळ, अकबरी प्लॉट, अकोट) याने न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र, सरकारी पक्षाने मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपीचा जामीन अर्ज नामंजूर केला.

दरम्यान, आरोपी जानेवारी २०२६ पासून अकोला कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहे. या हत्याकांड प्रकरणी अकोट ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून पुढील तपास सुरू आहे. जामीन अर्जावरील सुनावणीदरम्यान सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील अजित देशमुख यांनी बाजू मांडली. तर फिर्यादी पक्षातर्फे ॲड. मुन्ना खान आणि ॲड. श्रीरंग तट्टे यांनी कामकाज पाहिले.

# पातुर येथे स्वामी समर्थ साधना केंद्र सभागृहाचे उद्घाटन व प्राणप्रतिष्ठा सोहळा संपन्न

प्रतिनिधी ७ मे

**पातुर :** शहरातील भक्तांसाठी एक महत्त्वपूर्ण आध्यात्मिक केंद्र म्हणून उभ्या राहिलेल्या स्वामी समर्थ साधना केंद्राच्या सभागृहाचे उद्घाटन व प्राणप्रतिष्ठा सोहळा आज उत्साहात पार पडला. या सभागृहासाठी आमदार नितीन देशमुख यांनी तब्बल ५० लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता.

या निधीतून उभारण्यात आलेले भव्य सभागृह आता भक्तांसाठी खुले झाले असून, उद्घाटन प्रसंगी स्वामी समर्थांच्या पादुकांचे आमदार नितीन देशमुख यांनी सहपत्नी प्रांजलीताई देशमुख



यांच्या हस्ते विधिवत अभिषेक करण्यात आला. धार्मिक वातावरणात मंत्रोच्चार, पूजा-अर्चा आणि प्राणप्रतिष्ठा विधी पार पडला.

या कार्यक्रमाला शहरातील शेकडो महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. तसेच शिवसेनेचे आजी-माजी पदाधिकारी आणि स्थानिक नागरिकांनीही मोठ्या उत्साहात सहभाग नोंदविला.

या सभागृहामुळे पातुर परिसरातील भक्तांना साधना, भजन-कीर्तन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांसाठी एक सुसज्ज ठिकाण उपलब्ध झाले आहे. कार्यक्रमामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.


# श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे बालसंस्कार शिबिराला आरंभ

## ♦ राज्यभरातून विद्यार्थी दाखल, विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

प्रतिनिधी ७ मे

**अकोट :** श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था द्वारा श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे सर्वांगीण विकास बालसंस्कार शिबिर १ मे ते ३० मे दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. आहे. शिबिराचे उद्घाटन माजी उपजिल्हाधिकारी अशोक अमानकर तर कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थाध्यक्ष .ह.भ.प. वासुदेवराव महाराज महल्ले होते.

तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये आध्यात्मिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, वाणिज्य अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांमध्ये सर्वश्री मा. आ. वसंतराव खोटरे, विठ्ठल महाराज धोतर्डीकर,



भास्कर घोगरे, श्रीहरी सोनेकर, पुरुषोत्तम चौखंडे, डॉ. सुभाष भडांगे, किशोर फुलकर, योगेश अग्रवाल, नवीन कृपलानी, ज्ञानेशप्रसाद म. पाटील, रतन वसू, डॉ. गोपाल झामरे, शिबिर प्रमुख अंबादास मानकर, आदी मान्यवर उपस्थित होते. १ मे पासूनच राज्यभरातून बाल प्रशिक्षणार्थी या शिबिराकरिता दाखल झाले असून त्यांचा दैनंदिन परिपाठ, दिनचर्या व अभ्यासक्रम सुरू सुद्धा झाला आहे. या शिबिरामध्ये आध्यात्मिक, धार्मिक, सांस्कृतिक, ज्ञान- विज्ञान, संगणक प्रशिक्षण, योगासने, व्यायाम, प्राणायाम, मनोरंजन, संगीत, खेळ व कला विषयक विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

बालसंस्कार शिबिरांचे आद्यजनक श्री संत वासुदेव महाराज यांनी बालसंस्कार शिबिरांचे सन १९३९ पासून गावोगावी आयोजन करून संस्कार रुजविले आहेत. त्यांनी दाखविलेल्या मार्गाचे स्मरण करीत संस्था प्रतिवर्षी बालसंस्कार शिबिराचे आयोजन करीत आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. ७ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# आरटीओ कॅम्पमुळे उमरखेडच्या सा.बां. कार्यालयाला 'अघोषित सुट्टी'?

## विश्रामगृहातील गैरव्यवस्थेवर नागरिकांचा संताप; वाहतूक कोंडीने विद्यार्थीही त्रस्त



### 'निवेदन द्यायला गेलो, पण कार्यालयच बंद'

■ "छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्याला अडथळा ठरणारा भारतीय पेट्रोल पंप हटवण्याबाबत निवेदन देण्यासाठी आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात गेलो होतो. मात्र, तेथे एकही अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित नव्हता. संबंधित अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचाही प्रयत्न केला; मात्र प्रतिसाद मिळाला नाही."
- अभय पवार

प्रतिनिधी ७ मे

**उमरखेड** : दर महिन्याला तीन दिवस भरवण्यात येणाऱ्या आरटीओ कॅम्पमुळे उमरखेड येथील शासकीय विश्रामगृह आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (सा.बा.) कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कॅम्पच्या दिवशी प्रत्यक्षात सार्वजनिक सुट्टी नसतानाही कार्यालयातील कामकाज ठप्प होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

आरटीओ कॅम्पदरम्यान विश्रामगृह परिसरात वाहनांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून, त्या दिवशी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी कार्यालयात उपलब्ध नसतात, अशी चर्चा शहरात सुरू आहे. प्रभारी उपविभागीय अभियंता आणि कनिष्ठ अभियंता यांच्यासह संपूर्ण कर्मचारीवर्ग



'साइटवर' असल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात कार्यालय आरटीओ कर्मचारी आणि एजंटांच्या ताब्यात दिले जात असल्याचा आरोप होत आहे. २७ एप्रिल रोजीही कार्यालयात कामकाज नसल्याचे सांगितले जात आहे.

यामुळे शासकीय कामासाठी येणाऱ्या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. नियमित कार्यालयीन वेळेत अधिकारी व कर्मचारी उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. काही कर्मचाऱ्यांकडून टेबल, खुर्च्या यांसारखे शासकीय साहित्य एजंटांना भाड्याने दिले जात असल्याचीही चर्चा असून, शासनाच्या मालमत्तेच्या गैरवापराचा मुद्दा पुढे आला आहे.

विश्रामगृहातील दोन व्हीआयपी कक्ष एका खासगी व्यक्तीच्या ताब्यात असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. येथे अधिकृत पावतीशिवाय मालिश सेवा सुरू असल्याचे सांगितले जात असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

### महागाव रोडवर वाहतूक कोंडी

■ आरटीओ कॅम्पच्या दिवशी महागाव रोडवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असल्याने शाळकरी विद्यार्थी आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वाहतूक नियंत्रणासाठी कोणतीही प्रभावी व्यवस्था नसल्याने परिस्थिती अधिकच गंभीर होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विश्रामगृहातील खोल्या मनमानी पद्धतीने देणे, फर्निचर भाड्याने देणे यामुळे शासनाच्या महसुलालाही फटका बसत असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# 22 गोवंशांची सुटका; 16.95 लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी ७ मे



**पांढरकवडा** : नागपूरहून हैदराबादकडे कत्तलीसाठी अवैधरित्या नेल्या जाणाऱ्या २२ गोवंश जनावरांची पांढरकवडा पोलिसांनी कारवाई करत सुटका केली. या प्रकरणात ट्रकसह एकूण ₹१६,९५,७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चार आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

गस्तीवर असताना पोलीस हवालदार आनंद अलचेवार आणि पोलीस शिपाई विशाल वाढई यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे कोंघारा गावाजवळ ट्रक क्रमांक MH-31 CB-6490 अडवण्यात आला. तपासणीत ३ ते ५ वर्षे वयोगटातील २२ गोवंश जनावरे क्रूरपणे कोंबून नेली जात असल्याचे आढळले. जनावरांसाठी पाणी किंवा चाऱ्याची कोणतीही व्यवस्था नव्हती.

जप्त मुद्देमालामध्ये २२ गोवंश (८,७५,०००), आयशर ट्रक (८,००,०००) आणि मोबाईल संच (२०,७००) यांचा समावेश आहे.

या प्रकरणातील आरोपी - साहू खान सोयब खान (वय ३७, रा. कामगार नगर, नारी रोड, नागपूर), गुलाम रसुल मोहम्मद आले नबी (वय ४०, रा. कामगार नगर, नारी रोड, नागपूर), मोहम्मद शहजाद मोहम्मद एजाज कुरेशी (वय ३३, रा. कामगार नगर, नारी रोड, नागपूर), आणि नसीम कुरेशी (वय ४५, रा. कामठी, नागपूर) अशी त्यांची नावे आहेत.

या सर्वांविरुद्ध पांढरकवडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६०८/२०२६ नोंदवण्यात आला असून महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम व भारतीय न्याय संहिता अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सहा. पोलीस अधीक्षक रॉबिन बन्सल, पोलीस निरीक्षक एल.डी. तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. पुढील तपास सुरू आहे.

# शेतमाल भिजला : नुकसानभरपाईची मागणी

प्रतिनिधी ७ मे





## सेवानिवृत्त कामगार उपआयुक्त राजेश आडे यांचे निवेदन

**आर्णी** : अवकाळी पावसामुळे आर्णी कृषी उत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांचा मोठ्या प्रमाणात शेतमाल भिजल्याच्या घटनेनंतर संताप व्यक्त होत असून, सेवानिवृत्त कामगार उपआयुक्त तथा सामाजिक कार्यकर्ते राजेश आडे यांनी बाजार समिती प्रशासनाला निवेदन देत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची मागणी केली आहे.

मंगळवारी दुपारी अचानक झालेल्या पूर्वमोसमी पावसामुळे बाजार समितीत विक्रीसाठी आणलेला गहू, हरभरा, तूर आदी शेतमाल भिजला. बाजार समितीत सुमारे तीन हजार क्विंटल गव्हाची आवक झाली होती. त्यापैकी काही माल शेडमध्ये ठेवण्यात आला होता; मात्र मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचा माल उघड्यावर असल्याने तो पावसात भिजला. या घटनेत सुमारे १५०० क्विंटल गहू खराब झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर राजेश आडे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती व सचिव यांना निवेदन सादर केले. "व्यापाऱ्यांचा माल शेडमध्ये सुरक्षित ठेवण्यात आला; मात्र शेतकऱ्यांच्या मालाकडे दुर्लक्ष करण्यात आले. आधीच नैसर्गिक संकटे आणि बाजारभावातील अनिश्चिततेमुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर हा दुहेरी आघात आहे," असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात भिजलेल्या शेतमालाचे पंचनामे करून तातडीने नुकसानभरपाई जाहीर करावी, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, शेतकऱ्यांसाठी कायमस्वरूपी शेड व सुरक्षित साठवण व्यवस्था उपलब्ध करून द्यावी तसेच भिजलेल्या मालाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी शासनस्तरावर त्वरित निर्णय घ्यावा, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

अन्यथा शेतकरी बांधवांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

निवेदन देताना अविनाश ढाकुलकर, नंदू देशमुख, गोपाल कोटमकर, सचिन धाये, संतोष जयस्वाल, अनिल कोळेकर, विजय सोलंकी, बाबराव खोडणकर, गणेश एकंडवर, रमेश कोरटकर, हीरासिंग चव्हाण, अमित रामटेके, मनोज चांडक, अजाबराव सलामे, भारत बैस, खेमसिंग राठोड, अनिल चौधरी, संजय लिंगडवार, प्रमाद चोपडे आणि किशोर शेलुकार उपस्थित होते.



# पश्चिम बंगालमधील विजयानंतर भाजपचा जल्लोष

प्रतिनिधी ७ मे

**पुसद** : पश्चिम बंगालमध्ये भारतीय जनता पक्षाने ऐतिहासिक विजय मिळवत सत्ता काबीज केल्याच्या पार्श्वभूमीवर पुसदमध्ये भाजप कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. सोमवारी सायंकाळी येथील नेताजी सुभाषचंद्र बोस चौक येथे फटाक्यांची आतषबाजी, ढोल-ताशांचा गजर आणि मिठाई वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी भाजपचे जिल्हा महामंत्री दीपक सिंह परिहार, समाजभूषण अ‍ॅड. विश्वास भवरे, जिल्हा उपाध्यक्ष रवी ग्यानचंदानी, अश्विन जयस्वाल, अजय पुरोहित, संजय बजाज यांच्यासह अक्षय थोटे, संतोष मुकेश, संतोष आर्य, श्याम जोशी, संजय तुते, सतीश जयस्वाल, धीरज भार्गव, कुणाल जयस्वाल, नटवर उंटवाल, रवी मोगरे, आतिश धोबे, हितेश बोथरा, महेश काळे, पांडुरंग उतळे, ओम शिंदे, विजय पुरोहित, हितेश कामदार, माधवराव भराडे, गोविंदराव कुकडे, शैलेश मुदीराज, हेमंत अंभोरे, राजेश आळणे, सुरज पैठणकर, कैलास पैठणकर, ललित चव्हाण, गजानन हिंगमिरे, रमेश खंदारे, महेश शर्मा, नारायण पाटील, रमेश सोमानी, सुरज कुरील, आकाश खडसे, शिवाजी थोरात आदी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. ढोल-ताशांच्या गजरात कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत नागरिकांना मिठाई वाटली. चौक परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# ज्वारी, बाजरी खरेदीसाठी नऊ केंद्र; नोंदणीला १५ मेपर्यंत मुदतवाढ

प्रतिनिधी ७ मे

**यवतमाळ** : रब्बी हंगाम २०२५-२६ मध्ये आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत ज्वारी, बाजरी, मका आणि रागी खरेदीसाठी शेतकऱ्यांच्या ऑनलाईन नोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता ही नोंदणी १५ मे २०२६ पर्यंत करता येणार आहे.

जिल्ह्यात एकूण नऊ खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली असून, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड मार्फत ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. महागांव, पांढरकवडा, पाटण, पुसद, आर्णी, उमरखेड, घाटंजी, कळंब आणि राळेगाव या ठिकाणी खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. या केंद्रांमध्ये संबंधित तालुका खरेदी विक्री संघ तसेच सहकारी संस्थांचा समावेश आहे. शेतकऱ्यांना ज्वारी, बाजरी, मका आणि रागी विक्रीसाठी आधारभूत किंमत योजनेचा लाभ घेण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी आधारकार्ड, ७/१२ उतारा, पिकपेरा आणि बँक पासबुकची स्पष्ट झेरॉक्स प्रत घेऊन संबंधित खरेदी केंद्रावर प्रत्यक्ष उपस्थित राहून नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा मार्केटिंग अधिकारी विजय गाढवे यांनी केले आहे. नोंदणीची अंतिम मुदत वाढल्याने जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांना शासकीय दराने धान्य विक्रीची संधी उपलब्ध होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# पूर्वसूचना न देता वीजखंडित; सर्वपक्षीयांचा विद्युत कार्यालयावर हल्लाबोल

प्रतिनिधी ७ मे




**दिग्रस** : शहरात वारंवार होणाऱ्या अनियोजित वीजखंडितीमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून अखेर संतप्त सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी येथील विद्युत वितरण कार्यालयावर धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला. "पूर्वसूचना न देता लाईन बंद करून जनतेला वेठीस धरणे तात्काळ थांबवा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडू," असा इशारा यावेळी देण्यात आला.

दिवसभरात तब्बल तीन ते चार तास वीजपुरवठा खंडित होत असल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. वेळेवर वीजबिल भरणाऱ्या ग्राहकांना कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा बंद केला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला. तक्रारींसाठी संपर्क साधला असता फोन न उचलणे तसेच उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत असल्याने संताप वाढल्याचे चित्र दिसून आले.

याच पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय शिष्टमंडळाने एकत्र येत विद्युत वितरण कार्यालयात धडक देत प्रशासनाला धारेवर धरले. यावेळी भाजपा शहराध्यक्ष अभय इंगळे, शिवसेनेचे नगरसेवक बाळू जाधव, उबाठाचे शहर प्रमुख राहुल देशपांडे, काँग्रेसचे शहराध्यक्ष अरबाज धारीवाला, नगरसेविका स्वाती धावडे तसेच कविता सुकळकर आदी उपस्थित होते. या शिष्टमंडळाने मुख्य कार्यकारी अभियंता प्रशांत वाणी व सहाय्यक अभियंता सुरेंद्र वैष्णव यांच्याकडे तीव्र नाराजी व्यक्त केली. संबंधित अधिकारी आठवडाभरापासून रजेवर असल्याचे सांगण्यात आले. मात्र, वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन सहाय्यक अभियंता सुरेंद्र वैष्णव यांनी दिले. तरीही, भविष्यात अशीच अनियोजित वीजखंडिती सुरू राहिल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. त्यामुळे विद्युत विभागाच्या कार्यपद्धतीवर आता गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# हवामान तज्ज्ञ पंजाबराव डक यांचे आर्णीत मार्गदर्शन

प्रतिनिधी ७ मे

**आर्णी** : यंदाच्या बदलत्या हवामानामुळे शेतकऱ्यांमध्ये खरीप हंगामाबाबत चिंता वाढली असताना, हवामान तज्ज्ञ पंजाबराव डक यांचे मार्गदर्शनपर चर्चासत्र आणि शेतकरी मेळाव्याचे आयोजन १७ मे रोजी आर्णीत करण्यात आले आहे.

स्व. किसनराव इंगळे सार्वजनिक वाचनालय आणि अंजली ड्रेसेसच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, सायंकाळी ६ वाजता शहरातील श्री. म. द. भारती विद्यालय येथे हा मेळावा होणार आहे. अल निनो आणि ला निना या हवामान बदलांच्या परिणामामुळे यंदा पावसाच्या प्रमाणात चढ-उतार होण्याची शक्यता विविध हवामान अभ्यासकांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना प्रत्यक्ष हवामानाचा अंदाज, पावसाचे संभाव्य स्वरूप, कोणत्या महिन्यात पावसाचे प्रमाण अधिक राहू शकते, याबाबत सविस्तर माहिती देण्यात येणार आहे. स्व. किसनराव इंगळे सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष प्रल्हादजी इंगळे तसेच अंजली ड्रेसेसचे संचालक संतोष श्रीवास आणि राजेश श्रीवास यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हवामानविषयक मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# हज यात्रेसाठी रवाना होणा-या भाविकांचा सत्कार

## सुन्नी शाही जामा मस्जिद कमिटीचा उपक्रम

प्रतिनिधी ७ मे



**शेंबाळपिंपरी** : येथील सुन्नी शाही जामा मस्जिद कमिटीच्या वतीने हज यात्रेसाठी रवाना होणाऱ्या भाविकांचा पारंपरिक पद्धतीने उत्साहात सत्कार करण्यात आला. कमिटीचे अध्यक्ष मोहम्मद जैनुलआबेद्दीन सिद्दीकी यांच्या निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात गावातील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

हज यात्रेसाठी ५ मे २०२६ रोजी नांदेड येथून हैदराबाद विमानतळामार्गे मक्का मुकर्रमा व मदिना मुनव्वरा येथे प्रस्थान करणारे शेख जुबेर शेख ज़हूर, त्यांची पत्नी तसेच शेख उज़ेर शेख ज़हूर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यापूर्वी २४ एप्रिल रोजी जुम्मा नमाजानंतर गावातील परंपरेनुसार जामा मस्जिदमध्ये पेशइमाम, मौज्जन, कमिटी सदस्य तसेच पंचवेळा नमाज अदा करणाऱ्या भाविकांच्या हस्ते अत्तर, शाल आणि पुष्पहार देऊन यात्रेकरूंचे स्वागत करण्यात आले. यावेळी मस्जिदचे इमाम व खतीब शहर काजी मुफ्ती मोहम्मद शफीकोदीन सिद्दीकी यांनी हज यात्रेकरूंसाठी विशेष दुआ केली. उपस्थितांनी यात्रेकरूंना शुभेच्छा देत बंधुभावाने निरोप दिला. यानंतर विविध ठिकाणीही यात्रेकरूंचा सत्कार करण्यात आला. सिद्दीकी कुटुंबीय, मुनीरोदीन हाजी करीमोदीन सिद्दीकी, जमालोदीन कमालोदीन सिद्दीकी (टेलर), डॉ. शेख सादिक, शेख ज़मीर डांगे आदींसह अनेक मान्यवरांनी आपल्या निवासस्थानी त्यांचे स्वागत केले. गावातील सर्व धर्मीय बांधवांनीही प्रेमपूर्वक भेटून शुभेच्छा दिल्या.

३ मे रोजी नांदेड येथील रोशन फंक्शन हॉल येथे निरोप समारंभ व स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी इस्माईल खान पठाण, हमीद खान पठाण, शेख इश्तियाक जमादार, आरिफ शाह बाबू तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, पोलीस अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, हज यात्रेसाठी रवाना होणाऱ्या भाविकांवर सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत असल्याची माहिती मोहम्मद जैनुलआबेद्दीन सिद्दीकी यांनी दिली.

# सोईटचा अविनाश बुरलेवाड बनला फौजदार

## कष्ट, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यशाला गवसणी; ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी प्रवास

प्रतिनिधी ७ मे



**ढाणकी** : "जिद्द असेल, तर यश नक्कीच मिळते," याची प्रचिती ढाणकीजवळील सोईट महागाव येथील अविनाश पुंजाराम बुरलेवाड यांनी देऊन दाखवली आहे. वाशिम पोलीस दलात कार्यरत असलेल्या अविनाश यांनी खात्यांतर्गत फौजदार परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदावर झेप घेतली आहे. त्यांच्या या यशामुळे सोईटसह उमरखेड तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

अविनाश यांचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी ठरला आहे. सन २०१६ मध्ये पहिल्याच प्रयत्नात वाशिम पोलीस दलात भरती होत त्यांनी शासकीय सेवेत प्रवेश केला. मात्र, पोलीस शिपाई पदावर समाधान न मानता 'स्टार' लावण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले. पोलीस सेवेत असताना कर्तव्याचा ताण सांभाळत त्यांनी अभ्यासाचे सातत्य कायम ठेवले.

गेल्या पाच वर्षांपासून त्यांनी जिद्दीने अभ्यास करत खात्यांतर्गत स्पर्धा परीक्षेसाठी रात्रंदिवस मेहनत घेतली. ग्रामीण पार्श्वभूमी असूनही कोणत्याही अडचणींना न डगमगता त्यांनी हे यश संपादन केले. त्यांच्या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाला आहे.

आपल्या यशाचे श्रेय अविनाश यांनी आई-वडील, कुटुंबीय तसेच मार्गदर्शक प्रा. लाभशेटवार, विकास माने, प्रा. विठ्ठल राठोड यांच्यासह वरिष्ठ अधिकारी आणि सहकाऱ्यांना दिले आहे. योग्य मार्गदर्शन आणि अथक परिश्रम यांच्या जोरावरच हे स्वप्न पूर्ण झाल्याचे त्यांनी नमूद केले.

अविनाश बुरलेवाड यांचे हे यश केवळ वैयक्तिक न राहता ग्रामीण भागातील स्वप्न पाहणाऱ्या प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

सिटी न्यूज अमरावती

गुरुवार, दि. ७ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# विभागीय आयुक्तालयात ११ मे ला विभागीय लोकशाही दिन

**अमरावती:** विभागीय लोकशाही दिन प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येतो. त्यानुसार येत्या सोमवारी (दि. ११ मे २०२६ रोजी) सकाळी ११ वाजता विभागीय लोकशाही दिन व महिला लोकशाही दिनाचे आयोजन विभागीय आयुक्त कार्यालयात करण्यात आले आहे, असे अपर आयुक्त संजय जाधव यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. विभागीय लोकशाही दिनासाठी यापूर्वी प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात येईल. विभागीय लोकशाही दिनात तक्रार नोंदविण्यासाठी नागरिकांनी तसेच महिलांनी त्यांचे तक्रार अर्ज (तालुका, जिल्हा किंवा महापालिका लोकशाही दिनानंतर) विहित नमुन्यात १५ दिवस अगोदर दोन प्रतीत पाठविणे आवश्यक राहील. नागरिकांनी तक्रार अर्ज dcgamravati@gmail.com किंवा dcg_amravati@rediffmail.com या ई-मेलवर विहित नमुन्यात पाठविण्याचे आवाहन आयुक्तालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

# भोर तालुक्यातील नसरापूर येथील चिमुकलीवरील अत्याचार व हत्या प्रकरणातील आरोपीस कठोर शिक्षा द्या

## युवा स्वाभिमान पक्षाचे अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी ७ मे

**अमरावती :** पुणे जिल्हयातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे घडलेल्या चिमुकलीवरील अत्याचार व निर्घृण हत्या या अमानुष घटनेने संपूर्ण राज्य हादरले असून जनतेमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

एका निष्पाप मुलीवर गोठ्यामध्ये अत्याचार करून तिची हत्या करण्यात आलेली ही घटना अत्यंत संतापजनक व मानवतेला काळिमा फासणारी आहे.

या घटनेतील आरोपीचा फोटो समोर आल्यानंतर समाजात अधिकच रोष निर्माण झाला आहे. अशा विकृत प्रवृत्तीच्या व्यक्तींना कडक शिक्षा झाली पाहिजे, जेणेकरून भविष्यात अशा घटना घडण्यास




आळा बसेल. राज्या सरकारच्या वतीने शक्ती कायदा अमलात आणुन महिला व मुलींना कवच प्रदान करण्यासंदर्भात निर्णय घ्यावा.

युवा स्वाभिमान पार्टी महिला आघाडीच्या वतीने आपणास नम्र विनंती करण्यात येते की, आरोपीवर फास्ट ट्रॅक कोर्टामध्ये खटला चालवावा, आरोपीस कठोरात कठोर अशी फाशीची शिक्षा देण्यात यावी,पीडित कुटुंबास तात्काळ न्याय मिळवुन दयावा हि विनंती.

करण्यात आली यामध्ये उपमहापौर सचिन भेंडे ,नाना आमले , प्रा.प्रशांत वानखडे, सुमती ढोके, प्रिती रेवणे, किशोर जाधव अजय जयस्वाल गौरी मेघवानी रंजनी डोंगरे, प्रियंका पाटने ,अर्चना अशोक पांडे ,योगेश विजयकर, नंदा सावदे ,मिरा कांबळे, महेश मुलचंदानी, दिपक साहु संजय हिंगासपुरे माला खुरसुडे सागर लोखंडे, सविता नेवार, सुनिता राऊत, वनीता तंतरपाडे, मयुरी नेवारे मीना आगाशे, वर्षा पाटणे, सारिका अवघड सागर तोंडे यांनी निवेदन सादर केले.

# नवीन कामगार संहिता नियमावलीवर हरकती व सूचना नोंदवा

## कामगार उप आयुक्तांचे आवाहन

प्रतिनिधी ७ मे

**अमरावती:** महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागामार्फत राज्यातील कामगार कायद्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी नवीन कामगार संहितांच्या नियमावलीची घोषणा करण्यात आली आहे. याअंतर्गत औद्योगिक संबंध संहिता आणि वेतन संहिता यांबाबतच्या अधिसुचना दि. २८ आणि ३० एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या प्रस्तावित नियमावलीबाबत संबंधित व्यक्ती, कामगार संघटना आणि भागधारकांनी आपल्या हरकती व सूचना विहित मुदतीत नोंदवाव्यात, असे आवाहन अमरावती विभागाचे कामगार उप आयुक्त चं. अं. राऊत यांनी केले आहे.

औद्योगिक संबंध संहिता आणि वेतन संहिता यांसारख्या महत्त्वाच्या नियमांबाबत हरकती नोंदवण्यासाठी ४५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. ज्या नागरिकांना किंवा संघटनांना या नियमावलीबाबत काही बदल सुचवायचे असतील, त्यांनी आपल्या सूचना लेखी स्वरूपात 'कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१' या पत्त्यावर पाठवाव्यात. तसेच, mhed.labourcos@gmailed.com या ई-मेल आयडीवर देखील आपल्या सूचना पाठवता येतील. अधिसुचना प्रसिद्ध झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत प्राप्त होणाऱ्या सूचनांचाच विचार केला जाणार असल्याने, सर्वांनी या संधीचा लाभ घेऊन आपले मत नोंदवावे, असे आवाहन कामगार विभागातर्फे करण्यात आले आहे.

# 'बी.ए.' विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबत उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्णय!

## ते पन्नास दिवस आणि धग कादंबरीबाबत विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण सूचना

प्रतिनिधी ७ मे

**अमरावती:** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील बी.ए. भाग-२ (सत्र ४) च्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येते की, मराठी साहित्य विषयातील 'कादंबरी' या प्रकारांतर्गत अभ्यासासाठी असलेल्या दोन कादंबऱ्यांबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निकाल दिला असून, विद्यापीठाने त्याबाबतची अधिसूचना क्र. ६६/२०२६, दि. ५ मे, २०२६ जाहीर केली आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, बी.ए. भाग-२, सत्र ४ (मराठी साहित्य – मेजर – ५) मधील विद्यार्थ्यांना आता 'ते पन्नास दिवस' किंवा 'धग' या दोन कादंबऱ्यांपैकी एकाची निवड करण्याची मुभा देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षेचा अर्ज भरताना जो पर्याय निवडला असेल, त्यानुसारच त्यांची परीक्षा घेतली जाईल.

विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या पर्यायानुसार 'ते पन्नास दिवस' किंवा 'धग' यापैकी एका कादंबरीवर आधारित प्रश्नांची उत्तरे देता येतील. हा निर्णय केवळ शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी लागू असणार आहे. हा बदल रिट याचिका क्रमांक ३०२८/२०२६ मधील उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी म्हणून करण्यात आला आहे. तरी सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अधिसूचनेव्दारे अधिकृतरित्या कळविले आहे.

# शैक्षिक महासंघचा अमरावती जिल्हा द्विदिवसीय अभ्यासवर्ग उत्साहात

## अभ्यासवर्गातून निर्माण झालेल्या ऊर्जेतून राष्ट्रीय विचारांचे कर्तव्य पालन करावे - प्रा. प्रदीप खेडकर

प्रतिनिधी ७ मे

**अमरावती:** अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ च्या अमरावती जिल्हा शहर व ग्रामीण कार्यकारिणीतर्फे आयोजित द्विदिवसीय निवासी अभ्यासवर्ग, संघटन कार्य, नीती व नियोजन अभ्यासवर्ग सिकची रिसॉर्ट, वलगाव, अमरावती येथे उत्साहपूर्ण व सकारात्मक वातावरणात संपन्न झाला. या अभ्यासवर्गाला महासंघाचे राष्ट्रीय उच्च शिक्षण सचिव तथा महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष प्रा. प्रदीपजी खेडकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. अभ्यासवर्गाच्या अध्यक्षस्थानी विभागीय अध्यक्ष प्राचार्य डॉ. मीनलताई भोंडे होत्या.




अभ्यासवर्गातील विविध सत्रांमध्ये संघटनेचे उद्दिष्ट, महत्त्व, महिला प्राध्यापकांचा विद्यापीठाच्या निर्णय प्रक्रियेत सहभाग, माननीय संस्थाचालक व प्राचार्य यांच्यासमोर निर्माण होणाऱ्या समस्यांचे संघटनेच्या माध्यमातून निराकरण, संघटन भूमिका व भविष्यातील दिशा या महत्त्वपूर्ण विषयांवर प्रमुख पदाधिकारी, प्राचार्य व संस्थाचालकांसोबत सखोल चर्चा करण्यात आली. प्रत्येक सत्रामध्ये संघटन विस्तार, कार्यकर्त्यांची भूमिका, भविष्यातील दिशा तसेच शैक्षणिक क्षेत्रात निर्माण होणाऱ्या नव्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

अभ्यासवर्गातील एका विशेष सत्रात 'पंचपरिवर्तन' या विषयावर विदर्भ प्रांत सद्भावना विचार मंच प्रमुख श्री शिवाभाऊ पिंपळकर यांनी विशेष मार्गदर्शन केले. समाज परिवर्तनासाठी आवश्यक नागरिक कर्तव्य, परिवार प्रबोधन, स्वदेशी विचार, सामाजिक समरसता व पर्यावरण संरक्षण या मूल्यांचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. समाज सुसंस्कृत, समृद्ध व देशाच्या अखंडतेसाठी सजग राहण्यासाठी नागरिक कर्तव्यबोध व स्वबोध यांवर आधारित पाच प्रमुख आधारस्तंभ आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पंचपरिवर्तन उपक्रमाचा मुख्य उद्देश समाजातील मूलभूत मूल्यांची पुनर्स्थापना करून सुदृढ व सुसंवादी समाज निर्माण करणे हा आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. माननीय संस्थाचालक व प्राचार्य यांच्यासोबत झालेल्या संयुक्त बैठकीत शैक्षणिक संस्था चालविताना निर्माण होणाऱ्या विविध समस्या, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी, तसेच शासनाच्या पदभरतीसंदर्भातील निर्णयांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थित संस्थाचालकांनी या सर्व समस्यांवर संघटनेच्या माध्यमातून शासन स्तरावर प्रभावी पाठपुरावा करून ठोस निराकरणासाठी पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा ११ मे रोजी

प्रतिनिधी ७ मे

**अमरावती:** कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि. नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील मोर्शी रोड येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) येत्या ११ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता 'प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून आयटीआय उत्तीर्ण व अन्य पात्र उमेदवारांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. या भरती मेळाव्यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित 'एनआरबी बेअरिंग या कंपनीसह अमरावती जिल्ह्यातील विविध स्थानिक नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यासाठी फिटर, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, डिझेल मेकॅनिक, ऑटो इलेक्ट्रिशियन, सीएनसी ऑपरेटर, टूल अँड डाय मेकर, मशिनिस्ट, मशिनिस्ट ग्राइंडर, मशीन टूल मेंटेनन्स आणि मोटर मेकॅनिक या व्यवसायातून आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच १० वी, १२ वी, कोणत्याही शाखेचे पदवीधर आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंगमधील डिप्लोमा उत्तीर्ण उमेदवारांसह अंतिम वर्षात प्रशिक्षण घेत असलेले उमेदवारही या मेळाव्यात सहभागी होऊ शकतात. या संधीचा जिल्ह्यातील जास्तीत जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा, असे आवाहन औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे उपसंचालक तथा सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार यांनी केले आहे.

# आदर्श हायस्कूल येथे ग्रीष्मकालीन शिबिराचे समारोप

प्रतिनिधी ७ मे

**दर्यापूर :** येथील आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित भव्य ग्रीष्मकालीन कला, क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास शिबिराचा समारोपीय सोहळा ६ मे रोजी अत्यंत उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले साहेब होते. प्रमुख अतिथी व बक्षीस वितरक म्हणून अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे तसेच दर्यापूर-अंजनगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार गजानन लवटे उपस्थित होते. याशिवाय तालुका क्रीडा अधिकारी आर. बी. वडते यांची विशेष उपस्थिती लाभली.



कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अॅड. गजानन पुंडकर (उपाध्यक्ष, शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती), माजी प्राचार्य केशवराव गावंडे, कार्यकारिणी सदस्य तथा सदस्य शाळा समिती, सर्वश्री शाळा समिती सदस्य प्रा. पंजाबराव म्हाला, भागवतराव बुरघाटे, अण्णासाहेब रेचे आजीवन सदस्य,मा. डॉ. दिनकरराव गायगोले माजी संचालक, रामकृष्ण तराळ आजीवन सदस्य, शेषरावजी काळे आजीवन सदस्य, श्रीरामजी तायडे आजीवन सदस्य, नरेशभाऊ लड्ढा आजीवन सदस्य तसेच येवदा शिक्षण संस्थेचे सचिव हर्षुभाऊ देशमुख, शाळा निरीक्षक व्ही. डब्ल्यू. गावंडे, दानदाते . चारुदत्त गावंडे प्राचार्य एम. आर. देशमुख, उपमुख्याध्यापक एस. बी. ठाकरे सर, शिक्षक प्रतिनिधी अनिल भारसाकळे, शिक्षेकेत्तर प्रतिनिधी प्रदीप भारसाकळे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.ष्कार्यक्रमाची सुरुवात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे पूजन व प्रतिमापूजन करून करण्यात आली. त्यानंतर गौरवगीत सादर करून मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. डिजिटल क्लासरूमसाठी स्मार्ट टीव्ही उपलब्ध करून दिल्याबद्दल मा. आमदार गजानन लवटे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविकात प्राचार्य एम. आर. देशमुख सर यांनी विद्यालयाची यशोगाथा मांडली. बारावीचा उत्कृष्ट निकाल, पाचवी ते बारावी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा वाढता ओघ, एस.पी.सी. उपक्रमात मिळालेला द्वितीय क्रमांक तसेच शाळेची भावी वाटचाल याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

यानंतर विद्यार्थ्यांनी विविध प्रात्यक्षिके व चित्तथरारक कवायती सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा उद्या

प्रतिनिधी ७ मे

**अमरावती:** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र (मॉडेल करिअर सेंटर), अमरावती यांच्या वतीने शुक्रवार, दि. ८ मे २०२६ रोजी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात श्रीराम इन्शुरन्स लि. (अमरावती), गार्डियन ट्रेनिंग अकादमी आणि सिक्युरिटी प्रा. लि. (हैदराबाद) यांसारख्या नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून विविध पदांसाठी मुलाखती घेणार आहेत. पात्र उमेदवारांना निवडीनंतर लगेचच नोकरीची संधी उपलब्ध करून दिली जाईल.

इच्छुक उमेदवारांनी आपल्या अद्ययावत बायोडाटा, पासपोर्ट फोटो आणि आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांसह जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर, डेपो रोड, अमरावती येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे. या मेळाव्यासाठी कोणताही प्रवास भत्ता दिला जाणार नाही. अधिक माहितीसाठी कार्यालयीन दूरध्वनी ०७२१-२५६६०६६ किंवा ८९८३४१९७९९/८६०५६५४०२५ या क्रमांकावर अथवा amravatiro®ar@gmailed.com या ईमेलवर संपर्क साधण्याचे आवाहन सहायक आयुक्त यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील नागरिकांनी 'स्व-गणना' करावी

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे आवाहन

प्रतिनिधी ७ मे

**अमरावती:** जिल्ह्यामध्ये १ मेपासून स्व-जनगणनेच्या मोहिमेला सुरुवात झाली आहे. यावेळची जनगणना पूर्णपणे डिजिटल माध्यमाद्वारे होणार असून, नागरिकांना स्वतःची माहिती स्वतः भरण्याची म्हणजेच 'स्व-गणना' करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.

यावेळच्या जनगणनेमध्ये दि. १ ते १५ मे कालावधीत नागरिक स्वतःची नोंदणी करू शकतील. नागरिकांनी es. census. gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन आपला मोबाईल क्रमांक नोंदवून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी. यात साधारणपणे ३० प्रश्न विचारले जातील, ज्यांची उत्तरे देऊन नागरिक स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची माहिती भरू शकतील. ही माहिती भरल्यानंतर एक 'SE-ID' (Self-Enumeration ID) जनरेट होईल, जो नागरिकांना जपून ठेवावा लागेल. हा आयडी प्रत्यक्ष जनगणना करण्यासाठी आलेल्या प्रगणकाला द्यावा लागणार आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः स्व-गणना केली आहे. या प्रक्रियेसाठी केवळ दोन मिनिटांचा वेळ लागला आहे. नागरिकांनाही वेळ काढून या राष्ट्रीय कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे. दि. १५ मेनंतर, म्हणजेच दि. १६ मेपासून प्रशासनातर्फे नियुक्त केलेले प्रगणक घरोघरी येऊन नागरिकांनी भरलेल्या माहितीची पडताळणी करणार आहेत. डिजिटल जनगणनेच्या या सुविधेमुळे नागरिकांचा वेळ वाचणार असून ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि सुटसुटीत होणार आहे.

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचा ऑफर लेटर डिस्ट्रिब्युशन सोहळा उत्साहात

## महाविद्यालयातूनच ५८१ विद्यार्थ्यांना मिळाला नामांकित कंपनीत रोजगार ♦ विद्यार्थ्यांना रोजगार देणारी विदर्भातील एकमेव संस्था

प्रतिनिधी ७ मे

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपतर्फे आयोजित ऑफर लेटर वितरण सोहळा स्वामी विवेकानंद ऑडिटोरियम येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सुमारे चार हजार विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात विविध राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये निवड झालेल्या ५८१ विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह अप्रेसिएशन अवॉर्ड देऊन सन्मान करण्यात आला.

यावर्षी संस्थेच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत ११० हून अधिक कोअर व सॉफ्टवेअर कंपन्यांचे कॅम्पस ड्राइव्ह आयोजित करण्यात आले होते. अभियांत्रिकी, एमबीए, एमसीए, फार्मसी, कृषी आणि




आर्किटेक्चर या शाखांतील विद्यार्थ्यांना अंतिम वर्षातच नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या. विशेष म्हणजे अभियांत्रिकीच्या कोअर शाखां इलेक्ट्रिकल, सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकॉम्युनिकेशन मध्ये १०० टक्के प्लेसमेंट झाल्याचे यावेळी संस्थेमार्फत सांगण्यात आले.

संस्थेचे अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी सांगितले की, संस्थेने केवळ शैक्षणिक गुणवत्ता नव्हे तर उत्कृष्ट प्लेसमेंटद्वारेही विदर्भात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगार देणारी विदर्भातील एकमेव संस्था म्हणून नावलौकिक आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना पदवीसोबत रोजगारक्षम कौशल्यांची आवश्यकता लक्षात घेऊन उद्योगाभिमुख शिक्षणावर भर दिला जात आहे. सॉफ्टवेअरसोबतच मॅन्युफॅक्चरिंग, ऑटोमोबाईल, सोलर, कन्स्ट्रक्शन, इलेक्ट्रिक व्हेईकल, फिनटेक, बँकिंग, सेमीकंडक्टर आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स यांसारख्या विविध क्षेत्रांतील नामांकित कंपन्यांचा वाढता सहभाग हा संस्थेच्या विश्वासार्हतेचा पुरावा असल्याचे त्यांनी नमूद केले.

संस्थेच्या पुणे, मुंबई, नागपूर व हैदराबाद येथील प्लेसमेंट कार्यालयांमुळे उद्योगजगताशी सातत्यपूर्ण संपर्क राखला जात असल्याचे डीन कॉर्पोरेट रिलेशन व प्लेसमेंट डॉ. मोनिका जैन यांनी सांगितले. त्यामुळे विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण होत असून विविध शाखांतील विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यांमध्ये स्थान मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संचालक डॉ. पी. एम. खोडके यांनी विद्यार्थ्यांना इंडस्ट्री-रेडी बनविण्यासाठी संशोधन, आधुनिक प्रकल्प आणि कौशल्यविकासावर विशेष भर दिला जात असल्याचे सांगितले. उद्योगांच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांना सक्षम बनविण्याचा संस्थेचा सातत्यपूर्ण प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.

या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी संस्थेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्लेसमेंट विभागाच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच हे यश शक्य झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. विशेष म्हणजे, इतर महाविद्यालयांतील काही विद्यार्थ्यांनाही या उपक्रमातून रोजगाराच्या संधी मिळाल्या.

कार्यक्रमाच्या शेवटी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ,उपाध्यक्ष , संचालक तसेच विविध महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य, उपप्राचार्य , डीन, विभागप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
गुरूवार दि ७ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

व्हा दक्ष, द्या लक्ष
वाचवा वृक्ष...



# वाढत्या तापमानाचे शोधा कारण, नाहीतर होणार मरण...

# राज्यात राबवा हरित विकास धोरण !

## *सागर कोकास यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन *वृक्षतोड थांबवा, वृक्ष लागवड करा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

विदर्भातील अकोला, वाशीम, नागपूर, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ, चंद्रपूर आणि परिसरामध्ये मागील काही वर्षापासून तापमानामध्ये सातत्याने वाढ होत आहे.उन्हाळ्यामध्ये उष्णतेच्या लाटा अत्यंत धोकादायक स्वरूप धारण करत आहेत.अनेक ठिकाणी तापमान ४५ अंश सेल्सिअस ते ४८ अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचत असल्याने नागरिकांचे आरोग्य, जलस्त्रोत, शेती, पर्यावरण आणि स्थानिक अर्थव्यवस्था गंभीर संकटात सापडत आहे. विदर्भात सुरु असलेल्या झाडेतोड, रस्ते विकासामुळे वाढत्या तापमानावर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाने राज्यस्तरीय हरित विकास धोरण राबवून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण, हरित रस्ते कॉरीडॉर, अर्बन फॉरेस्ट.जलसंधारण आणि पर्यावरण संरक्षणाच्या उपाययोजना करण्याची मागणी आपचे पश्चिम विदर्भ प्रवक्ता सागर कोकास यांनी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात, विदर्भातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात वाढत्या रस्ते विकास प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत आहे.राष्ट्रीय महामार्ग ,राज्य महामार्ग, शहरातील रस्ते, उड्डाणपूल, रस्त्याचे कॉंक्रीटीकरण, वाढत्या इमारती, डांबरीकरण आणि अनियोजित शहरीकरणामुळे जमिनीची उष्णता साठवणूक वाढून शहरी उष्णता बेट प्रभाव निर्माण होत आहे.परिणामी ग्रामीण व शहरी भागात नैसर्गिक थंडावा कमी होत असून उष्णतेची तीव्रता अनेक पटींनी वाढत असल्याची बाब सागर कोकास यांनी स्पष्ट केली आहे.विदर्भातील परिस्थिती पाहता विकासासोबतच






पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी तातडीचे व्यापक राज्यस्तरीय धोरण राबविण्याची आवश्यक्ता आहे. वाढत्या तापमानावर शासन स्तरावर उपाययोजना राबवून विदर्भातील उष्णता कमी करण्यासाठी हरितपट्टा तयार करण्याची विशेष राज्यस्तरीय मोहिम सुरु करावी.अकोला, वाशीम, नागपूर, आणि विदर्भातील सर्व प्रमुख रस्ते, राष्ट्रीय महामार्ग, शहर रिंगरोड, औद्योगिक क्षेत्र, बसस्थानक, शासकीय कार्यालय, शाळा, महाविद्यालये, रूग्णालय परिसरात मोठ्या प्रमाणात हरित पट्टे विकसित करण्याची मागणीही सागर कोकास यांनी या निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात, पुढील स्थानिक व उष्णतेच्या प्रतिकारक वृक्षांचे प्राधान्याने वृक्षारोपण करण्यात यावे.यामध्ये कडुनिंब, पिंपळ, वड, अर्जून , ,करंज, जांभूळ, चिंच, कदंब, बेल, बहावा या झाडांचे वृक्षारोपण करण्यावर भर द्यावा.प्रत्येक ८ते १० मीटर अंतरावर दुहेरी रांगेत रस्त्यालगत वृक्ष लागवड सक्तीची करण्यात यावी, नवीन रस्ते प्रकल्प, औद्योगिक प्रकल्प, बांधकाम प्रकल्पाची पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन अधिक कठोर करण्यात यावे, एक झाड तोडल्यास किमान १० झाडे लावणे व ती पाच वर्ष जीवंत ठेवणे बंधनकारक करण्याचा कठोर कायदा लागू करण्यात यावा, सर्व महानगर पालिका, नगर परिषद क्षेत्रात अर्बन फॉरेस्ट, मियावाकी फॉरेस्ट, मिनी फॉरेस्ट आणि ग्रिन कॉरीडॉर्स उभारण्यात यावेत, शहरामध्ये कुल रुफ पॉलीसी लागू करून पांढरे, प्रतिबिंबित छत, ग्रिन रूफ, टेरेस गार्डन यांना प्रोत्साहन द्यावे, तलाव, नाले, विहिरी, जलाशय पुनर्जिवित करून जलसंधारण व भूजल पुनर्भरण प्रकल्प राबवावेत, शहरी नियोजनात ज्यातून पाणी किंवा द्रव जिरपू शकते असाअसा पृष्ठभाग, पावसाचे पाणी साठवणे आणि त्याचा पुनर्वापर करणे, वृक्ष संरक्षण क्षेत्र, उष्णति कमी करणारी रचना, उष्णतेच्या लाटेचा सामना करणारा कृती आराखडा तयार करणे अनिवार्य करणे, जिल्हानिहाय उष्णता कृती योजना तयार करून आरोग्य, पाणी, वीज, आणि पर्यावरण विभागामध्ये समन्वय साधावा, भौगोलिक माहिती प्रणाली आधारीत वृक्ष मोजणी, वृक्षसंवर्धन आणि देखरेख प्रणाली लागू करावी, तसेच वृक्षतोडीची परवानगी प्रक्रिया अत्यंत कठोर करून नागरिकांच्या सहभागास प्राधान्य द्यावे, पर्यावरण संरक्षणासाठी स्वतंत्र विदर्भ हरित निधी स्थापन करण्यात यावा, या उपाययोजना राबविल्यास त्याचे अपेक्षित परिणाम पुढील काळात दिसून येतील.त्यामुळे विदर्भातील तापमानामध्ये २ अंश सेल्सिअस ते ४ अंश सेल्सिअस पर्यंत घट होईल.रस्ते व कॉंक्रीट क्षेत्रातील उष्णता ५ अंश सेल्सिअस ते १० अंश सेल्सिअस पर्यंत कमी होईल.उष्णतेच्या लाटांवरील नियंत्रण वाढल्याने नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण होवून वायू प्रदुषणात घट, जलसंधारणात वाढ, जैवविविधतेचे संवर्धन, शेतीस पूरक हवामान आणि भविष्यातील हवामान बदलाचा प्रभाव कमी होणार असल्याचा दावाही सागर कोकास यांनी निवेदनात केला आहे. विदर्भातील विकास हा केवळ रस्ते, ईमारती व औद्योगिक विस्तारापुरता मर्यादित नसून नागरिकांचे जीवनमान सुरक्षित ठेवणे तितकेच आवश्यक आहे.जर शासनाने तातडीने उपाययोजना केल्या नाहीत तर भविष्यात विदर्भातील उष्णतेचे संकट आणखी तीव्र होण्याची शक्यता असल्याचेही सागर कोकास यांनी या निवेदनात नमूद केले आहे.या विषयास मुख्यमंत्री महोदयांनी गांभीर्याने घेवून राज्यस्तरावर विशेष कृती आराखडा जाहिर करून विदर्भासाठी दीर्घकालीन हरित विकास धोरण लागू करण्याची मागणीही आपचे पश्चिम विदर्भ प्रवक्ता सागर कोकास यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनामध्ये केली आहे.




## थोडक्यात

### लेकीच्या जिद्द व चिकाटीचा सन्मान करून नगरातील नागरिकांना नगर भोजन



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर तालुक्यातील पेडगाव येथील पत्रकार राजेश वानखडे यांच्या कन्येने २०२६ च्या पोलीस भरती प्रक्रियेत उल्लेखनीय यश संपादन केल्या बद्दल मुलीच्या जिद्द चिकाटी व परिश्रमातून यश संपादन करून महाराष्ट्र पोलीस म्हणून निवड झाल्यामुळे नगरातील नागरिकांना नगर भोजन देऊन भव्य सत्कार समारंभ दिनांक ५ मे रोजी उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाला परिसरातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.लेकीच्या सत्कार समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक किशोर शेळके , तहसीलदार सुधाकर अनासूने, निवासी तहसीलदार रवींद्र राठोड , नगरपरिषद चे अध्यक्ष अशोक भाऊ परळीकर सह मान्यवर मंडळी उपस्थित होती. या कार्यक्रमात गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षकवृंद, तसेच युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## डम्पिंग ग्राऊंड बनले प्रदुषणाचा भाग,

# दररोज लागते आग, आग, आग..!



### आगीचे व्हिडीओ दररोज सोशल मिडीयावर व्हायरल

डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्यावर प्रक्रिया न करता कचरा खाण्यासाठी दररोज आग लावल्या जात आहे. याचे व्हिडीओ सामाजिक कार्यकर्ते अखील तेलीसह परिसरातील नागरिक दररोजच व्हायरल करीत आहे. तरीही निद्रावस्थेत असलेल्या भ्रष्ट नगर पालिका प्रशासनाला जाग येत नाही. त्यामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी भ्रष्ट ठेकेदारांना व अधिकाऱ्यांना कचरा खाण्याचा सल्ला दिला. मात्र, जाळुन प्रदुषण करून जीव मारू नका असे आवाहन केले आहे. सिटी न्युज सुपरफास्टने ही प्रक्रिया न करता खाल्ला कचरा या संदर्भात ४७ वृत्तांची वृत्त मालिका लावून भ्रष्टाचार केल्याचे सिध्द केले आहे.

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

### परिसरातील रहिवाशांना विषारी धुराचा त्रास

वाशिम शहरातील हिंगोली नाका परिसरात असलेल्या डंपिंग ग्राऊंडला आज अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीमुळे कचऱ्याचे ढिगारे जळत असून धुराचे मोठमोठे लोट हवेत पसरले आहेत. या धुरामुळे परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होत असून आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.त्यामुळे प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

वाशिम शहरातील संपूर्ण कचरा हिंगोली नाका येथील डंपिंग ग्राऊंडवर टाकला जातो. येथे साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्याला आज अचानक आग लागल्याने परिसरात दुर्गंधीयुक्त आणि विषारी धूर पसरला आहे.

हा धूर गुप्ता ले आऊट, बिलाल नगर, मोहम्मद अली नगर यासह समोरील अनेक वस्त्यांमध्ये शिरत असल्याने येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि श्वसनाचे आजार असलेल्या रुग्णांना याचा मोठा फटका बसत आहे. कचरा जळाल्याने निर्माण होणारे प्रदूषण आणि विषारी वायू दीर्घकालीन आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरू शकतात. त्यामुळे नगर पालिका प्रशासनाने यावर तात्काळ उपायोजना करून हा डंपिंग ग्राऊंड शहराबाहेर हलवण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

वाशीम नगर पालिकेच्या डम्पींग ग्राऊंडवरील कचऱ्यावर १० ते १२ वर्षात प्रक्रिया न झाल्याने कचऱ्याचे डोंगरा ऐवढे ढिगच्या ढिग साचले होते. दै. 'सिटी न्युज सुपरफास्ट'ने कचऱ्यावर प्रक्रिया न करता कोट्यवधी रूपयाचा कचरा खाल्याचे वृत्त मालिका पुराव्यासह प्रसिध्द करून या कचऱ्यातील कोट्यवधीच्या भ्रष्टाचाराला वाचा फोडली होती.

# भिडे वाड्याची प्रतिकृती असलेला चित्ररथ वाशिम मध्ये दाखल !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

## *चित्ररथाचे वाशिमकरांनी केले जोरदार स्वागत

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती महोत्सवाच्या निमित्ताने ११ एप्रिल २०२६ ते १० एप्रिल २०२७ दरम्यान केंद्र व राज्य सरकारच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानिमित्त अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मंत्री छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली, माजी खासदार समीर भुजबळ व आमदार पंकज भुजबळ यांच्या संकल्पनेतून महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित चित्ररथाची निर्मिती करण्यात आली आहे. महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने हा चित्ररथ महाराष्ट्रभर फिरविण्यात येत आहे. हा चित्ररथ दि. ५ मे रोजी शहरात दाखल झाला. शहरवासीयांनी चित्ररथाचे जोरदार स्वागत केले. हा रथ पाहण्यासाठी शहरवासीयांनी मोठी गर्दी केली होती.

या चित्ररथामध्ये क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले, ज्ञानज्योती क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे अर्धाकृती पुतळे






तसेच महात्मा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. यासोबतच राजर्षी छत्रपती शाहू महाराज, घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे चित्ररथात साकारण्यात आले आहेत. विशेष म्हणजे महात्मा जोतीराव फुले लिखित पुस्तक व पेन या ज्ञानाच्या प्रतीकांची प्रभावी मांडणी करून समाजप्रबोधनाचा संदेश दिला जात आहे. तसेच यामध्ये भिडेवाड्याची प्रतिकृती देखील साकारण्यात आली आहे. राज्य शासनाच्या वतीने भिडे वाड्याचे नूतनीकरणाचे काम सुरू आहे.

त्यामुळे ही प्रतिकृती आकर्षणाचा केंद्र ठरली आहे. शहरात आगमन होताच या चित्ररथाचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी नगराध्यक्ष अनिल केंदळे, डॉ. विजय कानडे, नारायण नवले मुंबई, समता परिषदेचे प्रदेश चिटणीस प्रा. अरविंद गाभणे आदींसह मान्यवरांनी चित्ररथातील महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. भारत शहरातील विविध मार्गावरून फिरविण्यात आला. शहरातील नागरिक तसेच विद्यार्थ्यांनी रथाचे जोरदार स्वागत केले. तर अनेकांनी चित्ररथा समोर सेल्फी घेतले.

यावेळी क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले जयंती उत्सव समितीचे कार्यकर्ते, सत्यशोधक समाज, माळी कर्मचारी सेवा मंडळ, माळी युवा मंच, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद आदी संघटनांचे कार्यकर्ते, नगर परिषदेचे नगरसेवक, विविध पक्षांचे पदाधिकारी, तसेच शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या चित्ररथाच्या आगमनासाठी व नियोजनासाठी उमेश मोहळे, महादेव हरकळ, ज्ञानेश्वर वाशिमकर, जावेद भवानिवाले यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मातृदिनानिमित्त मंगरूळनाथ ब्रह्माकुमारीज परिवार करणार मातांचा सत्कार

### संचालिका ब्रह्माकुमारी सारिका दीदीचे आयोजन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, गोविंद ऑइल मिलच्या बाजूला मंगरूळनाथ येथे दिनांक १० मे रविवारी संध्याकाळी ५:३० ते ७:०० या वेळात मातृदिनाच्या निमित्ताने मातांच्या सत्काराचे विशेष आयोजन करण्यात आले आहे. मंगरूळनाथ सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी सारिका दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला वाशिम सेवा केंद्राच्या मुख्य संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी रुक्मिणी दीदी तर प्रमुख अतिथी म्हणून रिसोड सेवा केंद्र संचालिका ब्रह्माकुमारी ज्योती दीदी असणार आहेत. माता ही आमचे सुरक्षा



कवच आहे कारण ती आम्हांला प्रत्येक संकटातून बाहेर पडण्याची शक्ती आणि युक्ती प्रदान करते.मेणबत्तीप्रमाणे स्वतः आयुष्यभर जळत राहून इतरांच्या जीवनात प्रकाश निर्माण करण्याचे कार्य केवळ माताच अविरतपणे करीत असते. मातृदिनाच्या निमित्ताने ब्रह्मकुमारीज परिवार अकोला वाशिम सेवा केंद्र मुख्य प्रभारी आदरणीय राजयोगिनी ब्रह्माकुमारी रुक्मिणी दीदी यांचे विशेष मार्गदर्शन व आशीर्वाचन मिळणार आहे.

मातृत्वाच्या कृतज्ञता सोहळ्यात मोठया संख्येने सहभागी होण्याचे आवाहन मंगरुनाथ सेवा केंद्र संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी सारिका दीदी यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
गुरुवार, दि. ७ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# शेतकऱ्यांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या

## आ. खरात खरीप हंगामासाठी मेहकरात नियोजन बैठक

प्रतिनिधी ७ मे

**मेहकर:** खरीप हंगाम २०२६-२७च्या पार्श्वभूमीवर कृषी विभागाची महत्त्वपूर्ण नियोजन बैठक ५ मे रोजी आमदार सिद्धार्थ खरात यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीस मेहकर व लोणार तालुक्यांचे कृषी अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार खरात यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले. कामात दिरंगाई किंवा हलगर्जीपणा सहन केला जाणार नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. बैठकीत तालुका कृषी



अधिकारी किशोर काळे मेहकर व रविराज शिदोरे लोणार यांनी खरीप हंगामाचे नियोजन सादर केले. डॉ. अनिल तारू यांनी हुमणी अळी व्यवस्थापन व कृषी विज्ञान केंद्राच्या उपक्रमांबाबत मार्गदर्शन केले.

सोयाबीन क्षेत्रात १० हजार हेक्टरने घट करून मका, तूर व हळद पिकांकडे शेतकऱ्यांना वळविण्यासाठी जनजागृती करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच शेतमाल साठवणुकीसाठी गोडाऊन वाढविणे, महावितरणच्या कामकाजात सुधारणा करणे आणि पशुसंवर्धन योजनांचा लाभशेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उप कृषी अधिकारी विठ्ठल धांडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन विनोद डोंगरे सहाय्यक कृषी अधिकारी यांनी मानले. यावेळी कृषी सहाय्यक व कृषी मंडळ अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बसस्थानकातील चोरीचा तपास लागला

## आरोपीस जेरबंद करुन मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी ७ मे

**खामगाव:** शहरातील बसस्थानक परिसरात घडलेल्या चोरीच्या घटनेचा पोलिसांनी वेगाने उलगडा करत आरोपीला अवघ्या काही तासांत जेरबंद केले. या कारवाईत चोरीस गेलेला सुमारे १ लाख रुपयांचा सोन्याचा मुद्देमालही पूर्णपणे हस्तगत करण्यात आला आहे.

भगवान देवराव डुबल वय ८२ रा. शिवाजी नगर, जुना फैल, खामगाव यांनी याबाबत खामगाव शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. ४ मे रोजी सकाळी सुमारे ७.३० वाजताच्या सुमारास त्यांच्या आपल्या पत्नीसह बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या पायजम्याच्या खिशातून सोन्याचे दागिने चोरून नेले. चोरीस गेलेल्या ऐवजामध्ये १३ ग्रॅम सोन्याची चेन ५२ हजार, ६ ग्रॅम बदाम आकाराची अंगठी



२४ हजार, ४ ग्रॅम लाल खड्याची अंगठी १६हजार तसेच २ ग्रॅमचा सोन्याचा 'ओम' ८ हजार रुपये असा एकूण १ लाख रुपयांचा मुद्देमाल होता. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करून पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे अंबादास सुगदेव सुळोकार वय ४२ रा. वडोदे ले-आऊट, घाटपुरी, खामगाव हा आरोपी निष्पन्न झाला. पोलिसांनी त्याला अटक करून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल जप्त केला.

सदर कारवाई पोलिस अधिक्षक नीलेश तांबे, अपर पोलिस अधिक्षक श्रेणिक लोढा व उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलिस निरीक्षक आर. एन. पवार व सुरेंद्र अहेरकर यांच्या आदेशाने सहायक पोलीस निरीक्षक विकास पाटील, पोलिस हेडकॉन्स्टेबल सागर भगत, भीमराव वानखेडे, प्रदीप मोठे तसेच पोलिस कर्मचारी गणेश कोल्हे व अमरदीपसिंह ठाकूर यांनी यशस्वीरीत्या पार पाइली.

# जिल्ह्यात दोन शेतकऱ्यांची आत्महत्या

प्रतिनिधी ७ मे

**मलकापूर:** जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी कर्जबाजारीपणाला कंटाळून दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना उघडकीस आल्या आहे. यामध्ये मलकापूर येथील तरुण शेतकऱ्याने बुधवारी स्वतःच्या शेतात झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली. तर दुसऱ्या घटनेत धोत्रा भणगोजी ता. चिखली येथील शेतकऱ्याने राहत्या घरात गळफास घेवून जीवनयात्रा संपविली.

याबाबत प्राप्त माहिती अशी की, मलकापूर येथील दूर्गानगर बारादरी भागातील रहिवासी न.प. चे सेवानिवृत्त कर्मचारी किशोर रामभाऊ पाटील यांचे चिरंजीव गोपाल किशोर पाटील वय ४० वर्षे यांनी ६ मे रोजी दडाचा मारोती परिसरामध्ये असलेल्या स्वतःच्या शेतात झाडाला गळफास घेवून आत्महत्या केली. ही बाब सायंकाळी ५ वाजेदरम्यान बाजुच्या शेतातील शेतकऱ्यांना कळल्यानंतर उघडकीसआली. त्यानंतर त्यांचा मृतदेह स्थानिक उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आला व शवविच्छेदनानंतर मृतदेह कुटुंबियांच्या ताब्यात दिला. याबाबत वृत्त लिहिपर्यंत पोलिस स्टेशनला कोणतीही नोंद करण्यात आली नव्हती. मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्याची बारादरी, दूर्गानगर परिसरात चर्चा होती. त्यांचे पश्चात वडील, पत्नी, मुलगा व मुलगी असा आप्त परिवार आहे. तसेच दुसऱ्या घटनेत धोत्रा भणगोजी . चिखली येथील भानुदास दशरथ कोल्हे वय ४६ वर्षे यांनी मंगळवारी दिवसभर शेतात काम करून रात्री जेवण केल्यानंतर मध्यरात्री राहत्या घरात गळफास घेवून जीवनयात्रा संपविली. ही घटना दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या आईच्या निदर्शनास आली. शेतात झालेली नापिकी, बियाणे तसेच खताचे वाढलेले दर व पेरणी कशी करावी, पिकविमा मिळाला नाही व कर्जमाफीची वाट पाहत असह्य होवून घरातच गळफास घेवून जीवनयात्रा संपविली. त्यांचे पश्चात आई, पत्नी, मुलगा व मुलगी असा आप्त परिवार असून त्यांचेवर भारतीय स्टेट बँक व खासगी सावकारांचे कर्ज असल्याचे त्यांच्या कुटुंबियांनी सांगितले.

# सर्वांगीण विकास बालसुसंस्कार शिबिर संपन्न

प्रतिनिधी ७ मे

**संग्रामपूर:** पातुर्डा बु. येथील पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक (एनएमएमएस) शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले.

नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात ४० परीक्षार्थीमधून १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, अंकिता गजानन भोजने ही शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये महावीर देशमुख, मानव इंगळे, विराज दांडगे, गणेश निमकर्डे, नयना धर्माळ, पायल दाभाडे, शिवम खिरोडकार, खुशी दाभाडे, अंकुश वानखडे, ओम ढोकणे, कुंदन खंडेराव आणि अंकिता भोजने यांचा समावेश आहे.

ही परीक्षा महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद यांच्यावतीने घेण्यात येते. पात्र विद्यार्थ्यांना पुढील चार वर्षासाठी दरवर्षी १२ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळते. या यशामागे मुख्याध्यापक आर. एस. मावसकर, शिक्षक सचिन कराड, मनोहर जुमळे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विष्णु पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# भाजी विक्रेत्यांना टिळक मैदानात पर्यायी जागा देण्याची मागणी

## ♦ भाजी विक्रेत्यांचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी ७ मे

**खामगाव:** शहरातील फरशी भागात भरत असलेल्या नियमित भाजी बाजारात विक्रेत्यांसाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने विविध अडचणी निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर भाजी विक्रेत्यांनी मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत टिळक मैदानात पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. निवेदनानुसार, जागेअभावी सध्या विक्रेते मुख्य रस्त्यावरून टिळक मैदानाकडे जाणाऱ्या मार्गाच्या दोन्ही बाजूंना आपली दुकाने मांडत आहेत. परिणामी, जागेच्या कारणावरून वारंवार विक्रेत्यांमध्ये वाद होत आहेत. तसेच काही विक्रेते इतर दुकानांसमोर व्यवसाय करत असल्याने संबंधित दुकानदारांकडून विरोध होत असून, यामुळे किरकोळ वाद तणावात रूपांतरित होत आहेत. याशिवाय, मोकाट गुरांचा त्रासही विक्रेत्यांना सहन करावा लागत असून, त्यातून आर्थिक नुकसान होत आहे.

यामुळे विक्रेत्यांना टिळक मैदानात पर्यायी जागा देण्याची मागणी निवेदनातून केली आहे.भाजी खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांसाठी पार्किंगची कोणतीही व्यवस्था नसल्याने वाहनांची गर्दी वाढते. रस्ता अरुंद झाल्यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होत असून, या मार्गावरील सततची वर्दळ परिस्थिती अधिक गंभीर बनवत आहे. परिसरात स्वच्छतागृहाची सुविधा नसल्याने महिलांची गैरसोय होत आहे. या सर्व समस्यांमुळे विक्रेते आणि ग्राहक दोघांनाही मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, नगर परिषदेकडून टिळक मैदानात ओटे बांधून भाजी विक्रेत्यांसाठी नियोजित व पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# तहसील कार्यालयात मूलभूत सुविधांचा अभाव

प्रतिनिधी ७ मे

**सिंदखेडराजा:** तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था व स्वच्छतागृह सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) पदाधिकाऱ्यांनी ६ मे रोजी नायब तहसीलदार प्रांजळ पवार यांना निवेदन देऊन केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सिंदखेडराजा तहसील कार्यालयात दररोज ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने नागरिक



विविध शासकीय कामांसाठी येत असतात. सध्या वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असून, कार्यालय परिसरात आवश्यक मूलभूत सुविधांचा अभाव जाणवत आहे. तहसील कार्यालय परिसरात स्वच्छव थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, नागरिकांसाठी बसण्याची सुविधा, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह तसेच परिसरातील स्वच्छता व देखरेख व्यवस्था सुधारण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. सदर मागण्यांवर प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी पदाधिकाऱ्यांनी केली आहे. यावेळी उमेश खरात, सागर मेहेत्रे, नागेश कुरंगळ, सतीश आढाव, प्रदीप मेहेत्रे, दीपक भालेराव, अक्षय केळकर, कैलास म्हस्के आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# विविध मागण्यांसाठी न. प. कंत्राटी कामगारांचे धरणे

प्रतिनिधी ७ मे

**सिंदखेडराजा:** नगर परिषदेतील कंत्राटी सफाई कामगारांच्या प्रलंबित मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या वतीने ६ मे रोजी नगर परिषद कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मोठ्या संख्येने कंत्राटी कर्मचारी सहभागी झाले होते. कामगारांनी आपल्या न्याय्य हक्कांसाठी एकूण १९ मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर केले आहे. १९९३ ते २००० दरम्यान काम



केलेल्या कामगारांना शासन निर्णयानुसार कायम करणे, विमा संरक्षण आणि पी. एफ. कपातीची रक्कम खात्यात जमा करणे, समान काम, समान वेतन लागू करणे आणि १० वर्षे पूर्ण झालेल्यांना कोर्टाच्या आदेशानुसार कायम करणे. अस्वच्छ कामासाठी 'सेफ्टी कीट' उपलब्ध करून देणे, दिव्यांगांना ५ टक्के कोट्यातून कायम करणे आणि किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी करणे यासह विविध मागण्यांचा समावेश आहे.

यावेळी नगरपरिषदचे मुख्याधिकारी आशिष इंगळे राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाच्या राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघाचे राज्य सचिव मोहन मिसाळ यांच्याशी कंत्राटी कर्मचाऱ्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्ष देविदास ठाकरे नगर परिषदेची शिवसेनेचे गटनेते संदीप मेहत्रे, नगरसेवक कैलास मेहेत्रे, संतोष मेहत्रे, कैलास म्हस्के यांच्यासह नगरसेवक व विविध पक्षाचे पदाधिकारी व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी यांनी या धरणे आंदोलनाला भेटी दिल्या. यावेळी अध्यक्ष रमेश म्हस्के, कार्याध्यक्ष गजानन किसन मेहेत्रे, सरचिटणीस गणेश खांडेभराड यांच्यासह मोठ्या संख्येने कंत्राटी सफाई कामगार उपस्थित होते.

# खोटी माहिती देऊन लग्न; पतीसह तिघांविरुद्ध गुन्हा

## ♦ शारीरिक - मानसिक छळ व जीवे मारण्याची धमकी

प्रतिनिधी ७ मे

**शेगाव:** खोटी माहिती देऊन लग्न करून फसवणूक केल्याप्रकरणी, तसेच शारीरिक व मानसिक छळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या पतीसह आरोपावरून तिघांविरुद्ध शेगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा ५ मे २०२६ रोजी न्यायालयाच्या आदेशानंतर नोंदविण्यात आला.

कांचन रघुनाथ सिंग ठाकूर (४९, रा. गीतेचा मळा, अकोट रोड, शेगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी खोटी माहिती देऊन त्यांच्याशी विवाह करून त्यांची, तसेच एका शासकीय अधिकाऱ्याची फसवणूक केली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीला वारंवार शारीरिक व मानसिक त्रास देत मारहाण केली व जीवे मारण्याची धमकी दिली.

ही घटना १७ जुलै २०१५ ते ८ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार पोलिसांनी राकेश कुमार महेंद्र प्रताप सिंह (५३), आशादेवी महेंद्र प्रताप सिंह (७०) व मृदुला उर्फ प्राची दीपक सिंह (४६), सर्व रा. कादरेपूर, ता. बदलापूर, जि. जौनपूर (उत्तर प्रदेश) यांच्याविरुद्ध भा.न्या.सं. कलम ३१८(१), ३१८(२), ३१८(४), ३३५, ३३६(१), २३६, २३७, ८५, ११५(२), ३५१(२) व ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास शेगाव शहर पोलिस करीत आहेत.

# जिगाव प्रकल्पबाधित हिंगणा– ईसापूर येथील कुटुंबांना पायाभरणी व वाहतूक खर्च घर बांधण्यापूर्वी द्यावा

प्रतिनिधी ७मे

**खामगाव:** निमगाव जिगाव प्रकल्पात बाधित झालेल्या हिंगणा ईसापूर येथील कुटुंबांना वाहतूक खर्च घर बांधण्याआधी देण्यात यावा. या मागणीचे निवेदन संदीप भगवंतराव देशमुख व समस्त गावकरी मंडळी हिंगणा इसापूर यांचे वतीने ५ मे रोजी कार्यकारी अभियंता जिगाव उपसासिंचन उपविभाग खामगाव यांना देण्यात आले. निवेदनात नमूद आहे की, जिगाव प्रकल्पात आमचे घर व शेती गेली आहे. याचा मोबदला आम्हाला मिळाला आहे. पण हा मोबदला मिळून बराच काळ उलटून गेला आहे. त्यामुळे अनेक कुटुंबाचे विभाजन झाले. एका घरात राहणारे कुटुंब चार घरात विभागले गेले आहे. त्यामुळे मिळालेल्या पैशातही विभागणी



झाली. त्यामुळे नवीन गावठाणामध्ये घर बांधणे त्या कुटुंबांना शक्य नाही. तसेच गावातील २५ टक्के कुटुंबांना हा मोबदला एक लाख ते दीड लाखपर्यंत मिळाला. तसेच अनेक कुटुंब हे अतिक्रमण करून जुन्या गावात राहत आहेत. त्यांनाही हा मोबदला फार कमी प्रमाणात मिळाला. जुन्या कार्यकारी अभियंता गांव उप गावातील भाग हा पियुटीचा असल्याने तिथे बहुतेक घरे ही मातीचे आहेत. नवीन गावठाणमध्ये ६ ते ७ फुटापर्यंत काळी जमीन असल्याने तिथं मातीचे घर बांधणे शक्य नाही. त्यामुळे अनेक कुटुंबांसमोर घर बांधणे हे एक प्रकारे आव्हानच आहे. त्यामुळे गावातील गोरगरीब कुटुंबांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मिळणारा पायाभरणी व वाहतूक खर्च हा जर आधी दिला. तर त्यांना घर बांधण्यात मोठ्या प्रमाणात आधार होईल. तसेच जिगाव प्रकल्पात अनेक कुटुंब हे भूमीहीन झाले. त्यामुळे बाहेरगावी शेती घेऊन राहण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. तसेच गावात कोणत्याही प्रकारचा रोजगार उपलब्ध नसल्याने रोजगार शोधात बरेच कुटुंब बाहेरगावी घर बांधून स्थलांतरित झाले. अशा सर्व अन्यथा या गोरगरीब लोकांना नवीन गावठाणामध्ये पाल ठोकून राहिल्याशिवाय पर्याय उरणार नाही. सदर निवेदनावर अजबराव गाडे, प्रदीप देवकर, पंडितराव देशमुख, नंदकिशोर देशमुख, रोशन वाघ, शेषराव गाडे, समाधान अवचार, रोहन अवचार, विठ्ठल देशमुख, राजेंद्र गाडे, आदित्य देवकर, नारायण अवचार, शिवशंकर अवचार, पवन अवचार, श्रीकृष्ण अवचार, दिलीप तायडे, संजय अवचार, मोहनवाघ, राजेश वाघ यांचेसह अनेक गावकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# एटीएम कार्ड बदल करून १.३७ लाखांची फसवणूक

## ♦ तिघांविरोधात गुन्हा दाखल; सीसीटीव्हीच्या आधारे शोध

प्रतिनिधी ७ मे

**खामगाव:** शहरातील एटीएममध्ये मदतीच्या बहाण्याने एटीएम कार्ड बदल करून १ लाख ३७ हजार रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात अनोळखी तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ललेंद्र हरीभाऊ काबुकडे (वय ५०, रा. जलंब नाका) हे ३ मे २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास बँक ऑफ बडोदा शाखेच्या 'एटीएम'मध्ये व्यवहारासाठी गेले होते. दरम्यान, बाहेर थांबलेल्या तिघांनी तुमचा व्यवहार पूर्ण झाला नाही, असा बहाणा करत, त्यांच्याशी संवाद साधून विश्वास संपादन केला. मदतीच्या नावाखाली आरोपींनी काबुकडे यांना पुन्हा 'एटीएम'मध्ये नेले. एटीएम कार्ड हातात घेऊन क्षणार्धात दुसऱ्या व्यक्तीचे कार्ड देत अदलाबदल केली. त्यापैकी एकाने अत्यंत कौशल्याने त्यांचे

ही बाब लक्षात न आल्याचा फायदा घेत आरोपींनी त्यांच्या खात्यातून टप्प्याटप्प्याने १,३७,००० रुपये काढून घेतले आणिघटनास्थळावरून पसार झाले. घटनेची जाणीव होताच काबुकडे यांनी ५ मे रोजी पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानुसार बीएनएस कलम ३१८(२), ३१८(४) व ३(५) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक अमोल पाटे असून, करीत एटीएममधील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी आहे. पुढील तपास खामगाव शहर सुरु पोलिस करीत आहेत.

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

गुरुवार, दि. ७ मे २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# 84 खेडीचे ग्रामस्थ पाण्यासाठी धडकले मजीप्रा कार्यालयात !

**प्रतिनिधी ७ मे**

## ♦ शिवसेनेच्या नेतृत्वात ठिय्या आंदोलन, कार्यकारी अभियत्यांना दिली माठ, बांगड्यांची भेट

**अकोला :** उन्हाळा तीव्र होत असतानाच २५ दिवसानंतरही पिण्याचे पाणी मिळत नसल्याने अकोला तालुक्यातील ग्रामस्थांनी बुधवारी आक्रमक पवित्रा घेतला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्यांनी ग्रामस्थांना सोबत घेत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (मजीप्रा) कार्यालय परिसरात ठिय्या आंदोलन केले. पाण्यासाठी असलेले पाईप, नळ, बांगड्या व माठ अभियंत्यांना भेट देत अनोख्या पद्धतीने पाणी मिळत नसल्याचा निषेध केला. अभियंत्यांना धारेवर धरत जाबही विचारला. आंदोलकांच्या आक्रमक पवित्र्यामुळे मजीप्राच्या अभियत्यांनी गावनिहाय पाण्याचे नियोजन तेथेच जाहीर केले. आता पाच दिवसानंतर सहाव्या दिवशी पाणी पुरवठा होणार आहे.



८४ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना मजीप्रातर्फे चालवण्यात येते. मात्र अनेक गावांना २५ दिवसानंतर पुरवठा होतो. यापूर्वी योजनेच्या दुरुस्तीसह प्रचंड खर्च करण्यात आला. मात्र तरीही ग्रामस्थांना पुरेसा व वेळेवर पुरवठा होत नाही. दरम्यान ६ मे रोजी दहिहंडा, गणोरी, हिंगणी, वडद खु., रोहणा, ब्रम्हपुरी, पाटी, काटी, दोनवडा, ठोकबर्डी, जऊळखेड आदी गावातील ग्रामस्थांनी मजीप्राच्या कार्यालयात धाव घेत आंदोलन केले. कार्यकारी अभियंता, उपअभियंता, शाखा अभियंता, कंत्राटी कर्मचाऱ्यांना आंदोलकांवर पाणी पुरवठ्यावरून जाब विचारला. यावेळी शिवसेना उबाठाचे जिल्हा प्रमुख गोपाल दातकर, नगरसेवक अभय खुमकर, ज्ञानेश्वर गावंडे, संजय भांबेरे, अविनाश राऊत, गोपाल वावरे, श्रीकांत तिवारी, विश्वास मापे, सरपंच भिमराव आठवले, बजरंग बोदडे, गजानन चऱ्हाटे यांच्यासह ८४ गावे पाणी पुरवठा योजनेंतर्गत येणाऱ्या गावांतील शेकडो ग्रामस्थही उपस्थित होते.

### गावनिहाय पाणी पुरवठ्याचे केले नियोजन

शिवसेनेने सकाळी ११ वाजताच्या सुमारास ग्रामस्थांना सोबत घेत थेट मजीप्राचे कार्यालय गाठले. परिसरातच पाईपला जोडलेला नळ, माठ व बांगड्या घेत आंदोलन सुरु केले. काही वेळाने अभियंत्यांनी आंदोलनस्थळी येत आंदोलकांशी चर्चा केली. अभियंत्यांनी पाणी पुरवठ्याचे पोकळ आश्वासन देत वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. मात्र आंदोलक लेखी व गावनिहाय वेळेसह पाणी पुरवठ्याच्या नियोजनावर ठाम होते. सुमारे दोन तासानंतर अभियंते कक्षात गेले व त्यांनी गावनिहाय कोणत्या वेळी कोणत्या गावाला पाणी मिळेल, याचे लेखी नियोजन घेऊन ते जाहीर केले.

# मोबाईल ॲप द्वारे घेतला जाईल खतांच्या उपलब्धतेचा मागोवा

**प्रतिनिधी ७ मे**



**अकोला :** लवकरच खरीप हंगाम सुरू होणार आहे खरीप हंगामाच्या तोंडावर अकोला येथे डीएपी खताची पहिली खेप रविवारी दाखल झाली आहे. रासायनिक खतांच्या तुटवड्याच्या अफवा पसरवून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक टाळण्यासाठी कृषी विभागाने एक मोबाईल ॲप आणि क्यूआर कोड सुरू केला आहे या ॲपमुळे शेतकऱ्यांना जिल्ह्यातील खताच्या उपलब्धतेचा मागोवा घेता येईल. शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार रासायनिक खत कोणत्या विक्रेत्याकडे आहे हे शोधता येईल या सुविधेमुळे तुटवड्याच्या नावाखाली होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक टाळेल आणि त्यांचा वेळ व पैसाही वाचेल नुकतीच नागपुरात खरीप नियोजन बैठक संपन्न झाली या बैठकीत मोबाईल ॲप आणि क्यूआर कोड चे उद्घाटन करण्यात आले या ॲप द्वारे शेतकऱ्यांना पुरेसे खत उपलब्ध होईल रासायनिक खतांची अवैध विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल अकोला जिल्ह्याला १००० मॅट्रिक टन डीएपी खताचा पुरवठा करण्यात येणार आहे विशेष म्हणजे त्यापैकी ७५० मेट्रिक टन खत संरक्षित म्हणून राखून ठेवण्यात येणार असून संभाव्य टंचाईच्या काळात जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेनंतरच हा साठा टप्प्याटप्प्याने वितरित केला जाणार आहे खताचा पुरवठा सुरू आहे शेतकऱ्यांना आवश्यक खताचा पुरवठा लवकरच केला जाईल अकोला जिल्ह्यातही लवकरच कृषी विभागामार्फत हे मोबाईल ॲप आणि क्यूआर कोड सुरू केले जाईल.

### मोबाईल ॲप द्वारे खतांचा रोखणार काळाबाजार

◆दरवर्षी खरीप हंगामात खताची कृत्रिम टंचाई निर्माण करून काळाबाजार केल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त होतात याला आळा घालण्यासाठी प्रशासनाने खत साठ्याचे नियमित निरीक्षण निश्चित केलेल्या दराचे काटेकोर पालन यासारख्या उपायोजना राबविण्यात सुरुवात केली आहे आता त्याच्याच जोडीला कृषी विभागाचे मोबाईल ॲप आणि क्यू आर कोड आल्यानंतर खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी मोठी मदत मिळेल

# नाईक होमिओपॅथी तर्फे आज भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन

**रूग्णांना एक आठवड्याचे औषध मोफत दिले जाईल**

**प्रतिनिधी ७ मे**

**अकोला :** आरोग्य शिबिरामध्ये रुग्णांचे वजन, बीपी, उंची आणि फॅट अनालिसिस यांसारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच गुडघेदुखीच्या रुग्णांसाठी 'निमशिन' आणि सांधेदुखीच्या रुग्णांसाठी 'कोरियन बेड' देखील उपलब्ध असेल. शिबिरात येणाऱ्या रुग्णांची तपासणी केल्यानंतर त्यांना एक आठवड्याचे औषध मोफत दिले जाईल.गेल्या ४० वर्षांपासून नाईक होमिओपॅथीमध्ये सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. 'प्रत्येक आजारासाठी, प्रत्येक व्यक्तीसाठी आणि प्रत्येक घरासाठी नाईक होमिओपॅथी' हा संकल्प घराघरांत पोहोचावा आणि आजाराने त्रस्त असलेल्या गरजू रुग्णांना या शिबिराचा लाभ मिळावा, या उद्देशाने हे आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे.




दीर्घकाळापासून आजारी असलेल्या रुग्णांचे बॉडीस्कॅनद्वारे अचूक निदान केले जाईल. मधुमेह रुग्णांची रास्त दरात तपासणी केली जाईल. ब्लड टेस्टवर विशेष सवलत दिली जाईल. नाईक होमिओपॅथी, एनसीसी ऑफिस जवळ, आलसी प्लॉट, नवीन एसपी ऑफिस जवळ, अकोला. आरोग्य शिबिरात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाने आपली नोंदणी करणे अनिवार्य आहे. नोंदणीसाठी रुग्णांनी रुग्णालयाच्या ८३८०८२८३८० आणि ९१३००१६१२९ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नाईक होमिओपॅथीमध्ये उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने सांगितले की, 'मला थायरॉईडचा त्रास होता, सोबतच सिडिटी आणि मायग्रेनचा देखील खूप त्रास व्हायचा. परंतु, येथे उपचार सुरू केल्यानंतर अवघ्या एका महिन्यात माझे वजन ४ किलोने कमी झाले असून सिडिटी आणि मायग्रेनचा त्रासही आता कमी झाला आहे.'

# अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाडांचा जामीन फेटाळला !

## ♦ मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा आदेश

**प्रतिनिधी ७ मे**

**अकोला :** जिल्ह्यातील स्टोन क्रशर अपर उद्योजकांना खंडणी व लाच मागितल्याच्या तक्रारीनंतर जिल्हाधिकारी प्रमोद राहुल गायकवाड यांच्यावर एमआयडीसी पोलिस ठाण्यात १४ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा न्यायालयाने फेटाळल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली असता खंडपीठानेही आरोपी अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांनी खाण व स्टोन क्रशर उद्योजकांना खंडणी मागितली होती. विवेक प्रभाकर बिजवे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांना अपर जिल्हाधिकारी प्रमोद गायकवाड यांनी संघटनेचे पदाधिकारी असल्याने १५ हजार रुपये आणि संघटनेतील इतर सदस्यांकडून प्रत्येकी ५ हजार रुपये मासिक देण्याची मागणी केल्याचा आरोप केला होता. पैसे न दिल्यास खाण व क्रशर युनिटवर कारवाई करून व्यवसाय बंद पाडण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद केले होते. बिजवे यांनी अधिकाऱ्यांच्या शासकीय निवासस्थानी जाऊन १५ हजार रुपये दिल्याचा दावा केल्यानंतर या जबाबाच्या आधारे पोलिसांनी प्राथमिक चौकशी करून गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत कलम ७ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०८ (२) आणि कलम ३५१ (१) (धमकी) अन्वये प्रमोद गायकवाड यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# मिरवणुकीदरम्यान नवरदेवाच्या गाडीने घेतला पेट

**प्रतिनिधी ७ मे**



**बार्शीटाकळी :** तालुक्यातील कोथळी बुद्रुक येथे मंगळवार, ५ मे रोजी रात्री नवरदेवाच्या मिरवणुकी दरम्यान एक धक्कादायक घटना घडली. मिरवणुकीत वापरल्या जाणाऱ्या गाडीत फटाके ठेवलेले असताना अचानक आग लागून गाडी पेटली. काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण केले.

घटनेच्या वेळी मिरवणुकीत वऱ्हाडी नाचगाण्याचा आनंद घेत होते. मात्र, अचानक गाडीला आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. नवरदेवासाठी सजविलेली ही गाडी क्षणात आगीच्या भक्षस्थानी पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. ही घटना येथील गोदमले कुटूंबाच्या नवरदेवाच्या मिरवणुकी दरम्यान घडली.

उपस्थितांनी तत्काळ धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. गाडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मिरवणुकीदरम्यान फटाक्यांच्या वापरामुळे अशा प्रकारच्या घटना घडू शकतात, याची प्रचिती या प्रसंगातून आली आहे.

# महावितरणमध्ये खळबळ ई मेल कोणाच्या ताब्यात

## खोट्या ई-मेलद्वारे कंत्राटदाराला पाडले अपात्र 'अर्णव इलेक्ट्रिकल्स'ची पोलीस अधीक्षकांकडे धाव

**प्रतिनिधी ७ मे**

**अकोला :** एखाद्या कॉन्ट्रक्टरला ठेका मिळू नये यासाठी महावितरण मधील यंत्रणा कशी काम करते याचे जिवंत उदाहरण आज समोर आले आहे. कंत्राटदाराला बदनाम करण्याच्या या कट कारस्थानामध्ये आता थेट पोलिसात तक्रार केल्याने महावितरण कंपनीचे धाबे दणाणले आहे.

शासकीय यंत्रणेचा आणि अधिकारांचा गैरवापर करून एका व्यावसायिकाचे आर्थिक नुकसान करण्यासाठी रचलेले कटकारस्थान आता उघडकीस आले आहे. अकोल्यातील 'अर्णव इलेक्ट्रिकल्स' या फर्मला नाशिकमधील एका मोठ्या टेंडर प्रक्रियेतून बाहेर काढण्यासाठी महावितरणच्या अकोला शहर विभागातून चक्क खोटा आणि दिशाभूल करणारा ई-मेल पाठवण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी संबंधित दोषींवर गुन्हा दाखल करण्यासाठी व्यावसायिक गणेश सारसे यांनी अकोला पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केली आहे.

अर्णव ईलेक्ट्रिकल्स यांनी महावितरणच्या नाशिक च्या कळवण विभाग अंतर्गत निघालेल्या टेंडर प्रक्रियेत सहभाग घेतला होता. मात्र, ३० एप्रिल २०२६ रोजी त्यांना एका ई-मेलद्वारे कळवण्यात आले की, त्यांना या टेंडर प्रक्रियेतून अपात्र ठरवण्यात आले आहे. जेव्हा सारसे यांनी याबाबत अधिक चौकशी केली, तेव्हा त्यांना समजले की अकोला शहर विभागाच्या अधिकृत ई-मेल आयडीवरून नाशिकच्या कार्यालयांना त्यांच्याबद्दल चुकीची आणि खोटी माहिती पाठवण्यात आली होती. अकोला शहर विभागाच्या कार्यालयातून २ एप्रिल २०२६ रोजी हा खोटी माहिती देणारा मेल पाठवण्यात आला. विशेष म्हणजे, हा ई-मेल पाठवल्यानंतर तो रेकॉर्डमधून डिलीट करून पुरावा नष्ट करण्याचाही प्रयत्न झाला असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सुरुवातीला अकोला कार्यालयाने असा कोणताही मेल पाठवला नसल्याचे तोंडी सांगितले होते. मात्र, मुख्य अभियंत्यांच्या हस्तक्षेपानंतर ४ मे २०२६ रोजी अकोला शहर विभागाने 'सदर ई-मेल आम्ही केला नाही' असा खुलासा देणारे पत्र काढले. या प्रकारामुळे अर्णव ईलेक्ट्रिकल्सला आर्थिक फटका बसला असून त्यांच्या उपजीविकेवर गदा आली आहे. या संपूर्ण कटात महावितरणच्या काही अधिकाऱ्यांचा किंवा कर्मचाऱ्यांचा सहभाग असल्याची शक्यता तक्रारदाराने वर्तवली आहे. या प्रकारामुळे महावितरणच्या प्रशासकीय पारदर्शकतेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, अकोला पोलीस यावर काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विस्थापितांच्या मागण्या तात्काळ मार्गी लावणार !

**प्रतिनिधी ७ मे**

## ♦ जिल्हाधिकाऱ्यांचे आश्वासन, उम्मीद फाउंडेशनचे बेमुदत आंदोलन मागे

**अकोला :** अकोला जिल्ह्यात सिंधी विस्थापित बांधवांसाठी शासनाने जाहीर केलेल्या विशेष अभय योजनेची अंमलबजावणी अद्यापही रखडल्याचा आरोप करत उम्मीद फाऊंडेशनचे सेक्रेटरी हरिश पारवाणी यांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला होता. बुधवारी जिल्हाधिकारी यांनी या बाबत तात्काळ दखल घेत सिंधी विस्थापित बांधवांच्या मागण्या तात्काळ मार्गी लावणार, असे आश्वासन दिल्यामुळे उपोषण स्थगित करण्यात आले आहे.



शासन निर्णयानुसार १५ मे २०२५ रोजी सुरू झालेल्या या योजनेचा कालावधी १५ मे २०२६ रोजी संपत असताना, आतापर्यंत सुमारे २१० ते २२० प्रकरणे दाखल झाली असली तरी त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही, असा आरोप करण्यात आला आहे. संबंधित विभागाकडून वारंवार अतिरिक्त कागदपत्रांची मागणी होत असल्याने लाभार्थ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याचेही त्यांनी सांगितले. महसूल विभागाकडून समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्याने ११ मे २०२६ पासून उम्मीद फाउंडेशनची सेक्रेटरी हरीश बनवारीलाल पारवानी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशारा दिला होता. दरम्यान आज जिल्हाअधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन यावर मागण्या पूर्ण करण्याचा आश्वासन सिंधी समाजाच्या बांधवांना देण्यात आले. त्यामुळे ११ मे पासून होणारे आमरण उपोषण पुढील काही काळासाठी स्थगित करण्यात आले आहे. सिंधी विस्थापित बांधव गेली ७० वर्ष झाले भारिप पाकिस्तान फाळणीच्या वेळी पश्चिम पाकिस्तान मधून आपले घरे सोडून आले आहेत आतापर्यंत वेळोवेळी त्यांना शासनाकडून कुठलेही सहकार्य मिळाले नाही. तसेच महाराष्ट्र शासनाच्या १५ मार्च २०२५ च्या शासन निर्णयानुसार आवश्यक असलेली कागदपत्रे संबंधित विभागांमध्ये दाखल केली असून आतापर्यंत त्यावर कुठलीही कारवाई केली नाही. या व इतर मागण्यांचा शासन स्तरावरून कोणताही विचार न झाल्यामुळे उम्मीद फाउंडेशनचे सेक्रेटरी हरीश बनवारीलाल पारवानी यांनी आमरण उपोषण चा इशारा दिला होता. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी दखल घेत आश्वासन दिले, त्यामुळे सदरची आमरण उपोषण काही काळाकरिता स्थगित करण्यात आले आहे. याबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक संपन्न झाली. यावेळी उम्मीद फाउंडेशनचे सेक्रेटरी हरीश बनवारीलाल पारवानी, अध्यक्ष श्रीचंद मतांनी, प्रमुख सल्लागार जोसाभाई मोटवानी, कार्यकारी अध्यक्ष कन्हैयालाल रंगवानी, उपाध्यक्ष कोडूमल चावला, सुरेश संतांनी, सचिव हरीश पारवानी, सहसचिव दिनेश अग्रवाल, कोषाध्यक्ष राहुल संतांनी, सदस्य गिरधर पोपटाणी, मनीष लोकवाणी, अनुज गोयल, आशिष कटारिया, श्यामसुंदर कोहर, कायदा सल्लागार एडवोकेट प्रणव मार्केपाटील, उपाध्यक्ष दिवनाले, हरीश कटारिया, दीपक मनवाणी व जीवदरमानी आदी सिंधी समाजाचे बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रेल्वे चालकाच्या तत्परतेने वाचले वृद्धांचे प्राण



**प्रतिनिधी ७ मे**

**अकोला :** जिल्यात एक काळजाचा ठोका वाढवणारी घटना समोर आली आहे. चक्क एका वयोवृद्ध व्यक्तीने रेल्वे रुळावर आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असून रेल्वे चालकाच्या कार्यतत्परतेने त्याचा जीव वाचला आहे.

ही घटना घडली आहे अकोला अकोट मार्गावर धावणाऱ्या डेमु रेल्वे मार्गावर..आज सकाळी ९ वाजून ४० मिनिटांनी अकोट वरून अकोला करीता डेमु रेल्वे निघाली..रेल्वे ने वेग पकडताच अचानक रेल्वे ड्रायवर ला गांधीग्राम ते उगवा रेल्वे रुळावर एक वयोवृद्ध व्यक्ती आत्महत्या करण्या साठी झोपलेला दिसून आला.त्याच वेळी रेल्वे ड्रायवर ने समय सूचकता दाखवीत रेल्वे थांबवुन स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्याला बाहेर काढीत जीवनदान दिले..हा वयोवृद्ध कोण व कुठला? या बाबत जास्त माहिती मिळू शकली नाही....पुढील तपास पोलीस करीत आहेत. या घटनेमुळे घटनास्थळी बघ्यांची एकच गर्दी जमली होती.

# अकोल्यात फिरलं वारं.. आकाशात दाटले ढग..

**प्रतिनिधी ७ मे**

## धुळीच्या लोटाने वाहन चालक त्रस्त



**अकोला :** महाराष्ट्रात मे महिन्याच्या सुरुवातीलाच निसर्गाचा लहरीपणा पाहायला मिळत आहे. राज्यावर सध्या उष्णतेची लाट आणि अवकाळी पाऊस अशा दुहेरी संकटाचे सावट असून, हवामान विभागाने ७ मे रोजी राज्यातील १४ जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' जारी केला आहे.

विदर्भासह उत्तर महाराष्ट्रात तापमानाचा पारा ४४ अंशांच्या उंबरठ्यावर असतानाच, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. आज गुरुवारी सकाळी आकाश निरभ्र असताना व दुपारी बारा वाजेपर्यंत कडाक्याचे ऊन असल्याने शहरातील रस्त्यांवर तुरळक वाहतूक दिसून आली परंतु दुपारी बारा वाजेनंतर अचानक वातावरणात बदल पहावयास मिळाला आकाशात बदली दाटून आली तसेच जोराचा वारा सुरू झाला या वाऱ्यामुळे उडालेल्या धुळीच्या लोटाने शहरातील रस्त्याने येजा करणारे वाहन चालक तसेच रस्त्याच्या कडेला व्यवसाय करणाऱ्या नागरिकांना परेशानीचा सामना करावा लागला.

### महाराष्ट्रात उन- सावलीचा खेळ

◆समोर आलेल्या माहितीनुसार, कोकण किनारपट्टीवर सध्या प्रचंड आर्द्रता वाढल्याने नागरिक घामाच्या धारांनी हैराण झाले आहेत. दमट हवामानामुळे नागरिक हैराण झाले असून, पुढील ७२ तास हीच स्थिती कायम राहण्याचा अंदाज आहे. विशेष म्हणजे राज्यात उकाड्यासोबतच पावसाची हजेरी लागण्याची शक्यता आहे. ताशी ४० ते ५० किमी वेगाने वारे वाहणार असून घाटमाथ्यावर पावसाचा जोर अधिक असेल. राज्यातील अनेक जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135